रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २४७
www.ramprahar.com
◆ गुरुवार, २६ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## आंबा-काजू उत्पादकांना राज्य सरकार करणार आर्थिक मदत



**मुंबई :** गेल्या काही दिवसांत झालेल्या अवेळी पाऊस आणि हवामान बदलामुळे कोकणातील आंबा आणि काजू पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने अत्यंत सकारात्मक पाऊल उचलले असून, फळ पीक विमा न उतरवलेल्या शेतकऱ्यांनाही आर्थिक मदत देण्याची तयारी दर्शविली आहे. मुख्यमंत्री यांनी बुधवारी विधानसभेत यासंदर्भात सविस्तर माहिती देत पंचनामे करण्याचे आदेश दिले असल्याचे जाहीर केले. हवामान आधारित फळ पीक विमा योजनेअंतर्गत आंबा उत्पादकांसाठी प्रति हेक्टर २ लाख २७ हजार रुपये नुकसान भरपाईची तरतूद आहे. तर काजू उत्पादकांसाठी प्रति हेक्टर १ लाख ६० हजार रुपये नुकसान भरपाई मिळू शकते. नुकसानीचे स्वरूप पाहता यंदा ही मदत वाढवून २२ हजार रुपये प्रति हेक्टर देण्याचा सरकारचा मानस असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## अंतरंग


नवी मुंबई विमानतळाची कनेक्टिव्हिटी वाढणार/२
जागतिक क्षयरोग दिनानिमित्त जनजागृती/७
मुरूडमध्ये बीएसएनएलचे नेटवर्क ठप्प/८

# महिलांची डिजिटल बदनामी ठरणार गुन्हा

### तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षेत तरतुद

**मुंबई : प्रतिनिधी**

सोशल मीडिया किंवा इतर कोणत्याही डिजिटल माध्यमाद्वारे महिलांची बदनामी करणे, अश्लील व्हिडिओ किंवा फोटो प्रसारित करणे आता महागात पडणार आहे. राज्य सरकारने अशा विकृत कृत्यांना थेट 'लैंगिक गुन्ह्यांच्या' श्रेणीत समाविष्ट केले असून, यासाठी तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद असणारे 'भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६' बुधवारी (दि.२५) विधान परिषदेत एकमताने मंजूर करण्यात आले.




कोणत्याही डिजिटल प्लॅटफॉर्मवर महिलांविषयी अश्लील मजकूर प्रसिद्ध करणे किंवा त्यांची बदनामी करणे, हा आता गंभीर लैंगिक गुन्हा मानला जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी 'भारतीय न्याय संहिता (बीएनएस) महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६' विधानसभेत सादर केले. यामध्ये तत्कालीन 'शक्ती' कायद्यातील दोन अत्यंत महत्त्वाच्या तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे.

राज्याने मंजूर केलेला शक्ती कायदा आणि केंद्राचा नवीन 'बीएनएस' कायदा यामध्ये विसंगती टाळण्यासाठी पोलीस महासंचालकांच्या समितीने अभ्यास केला होता. शक्ती कायद्यातील बहुतांश तरतुदी केंद्राच्या कायद्यात आल्या असल्या तरी, दोन महत्त्वाच्या कलमांचा त्यात समावेश नव्हता. या उणिवा दूर करण्यासाठी राज्य सरकारने आता स्वतंत्र सुधारणा विधेयक आणले आहे.

मुख्यमंत्र्यांनी सभागृहात या विधेयकातील अतिरिक्त कलमांची माहिती दिली. ते म्हणाले, बलात्कार पीडितांप्रमाणेच आता ॲसिड हल्ल्यातील पीडितांचीही ओळख उघड करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. ओळख उघड करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. टेलिफोन, ईमेल, सोशल मीडिया किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अश्लील संवाद साधणे, महिलेच्या शरीराच्या भागाचे बनावट (मॉर्फ) चित्रण करणे किंवा लैंगिक कृत्याची चित्रफीत प्रसारित करण्याची धमकी देणे, याला लैंगिक छळवणुकीचा गुन्हा मानले जाईल.

या विधेयकातील दुसरा सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे ॲसिड हल्ल्यातील पीडित महिलांची ओळख आता गुप्त ठेवली जाणार आहे. यामुळे पीडितेच्या सामाजिक प्रतिष्ठेचे रक्षण होण्यास मदत होईल. या दुरुस्त्या आता अंतिम मंजुरीसाठी केंद्राकडे पाठवण्यात येणार आहेत.

आमदार हेमंत पाटील यांनी लहान मुले आणि पुरुषांवर होणाऱ्या अत्याचाराचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, महिलांप्रमाणेच लहान मुले आणि पुरुषांवरील अत्याचाराच्या घटनांवर 'पोक्सो' आणि इतर कायद्यांतर्गत तत्काळ कारवाई करण्याची तरतूद आधीच अस्तित्वात आहे.

# सिडको अधिकाऱ्यांवर कारवाई होणार -मंत्री गोगावले

### ■ आमदार महेश बालदी यांच्या मुद्द्यांवर सरकार गंभीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडको महामंडळाच्या कारभारातील अनियमितता, भ्रष्टाचार आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेच्या पार्श्वभूमीवर आमदार महेश बालदी यांनी विधानसभेत अर्धा तास चर्चेच्या अनुषंगाने अत्यंत महत्त्वाची सार्वजनिक बाब उपस्थित केली. विशेषतः सिडकोतील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून मिळत असलेल्या कथित पाठबळामुळे गैरप्रकारांना खतपाणी मिळत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. आमदार महेश बालदी यांच्या मुद्द्यांवर सरकार गंभीर झाले असून सिडको अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश सरकारकडून देण्यात आले आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अनुषंगाने विधिमंडळात अर्धा तास चर्चा मंगळवारी उशिरा रात्री जवळपास ११ वाजेपर्यंत सुरु होती. शासनाकडून सिडकोच्या अधिकाऱ्यांना सभागृहात उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले होते, मात्र अधिकारी गैरहजर राहिल्याने तालिका अध्यक्ष सुनील प्रभू, आमदार महेश बालदी यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. जेवढी जबाबदारी मंत्र्यांची आहे त्यापेक्षा जास्त सिडको अधिकाऱ्यांची आहे. या महत्वाच्या विषयाच्या अनुपस्थिती हा सभागृहाचा अपमान आहे त्यामुळे सिडकोच्या बेजबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी



करून कारवाई करा, असे निर्देश तालिका अध्यक्ष सुनील प्रभू यांनी यावेळी दिले.

आमदार महेश बालदी यांनी विधानसभेत नमूद केले की, लोकनेते दि. बा. पाटील साहेब यांनी १९७० साली साडेबारा टक्के योजना सुरू केली होती. या योजनेचा मुख्य उद्देश प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात विकसित भूखंड देणे हा होता, मात्र सिडकोच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या योजनेचा लाभ आजतागायत अनेक शेतकऱ्यांना पूर्णपणे मिळालेला नसल्याचे सांगून प्रकल्पग्रस्तांना तब्बल ५० ते ५८ वर्षे उलटूनही साडेबारा टक्के भूखंडांचा लाभ मिळालेला नसल्याची गंभीर बाब त्यांनी अधोरेखित केली. द्रोणागिरी, करंजाडे, कामोठे आदी भागांतील शेतकऱ्यांच्या तीन-तीन पिढ्या या प्रश्नात अडकल्या असून अनेक प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत.

न्याय मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे न्यायालयाच्या पायऱ्या चढाव्या लागत असल्याचे त्यांनी सांगितले. "या योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांना झाला आहे का?" असा थेट सवाल उपस्थित करत त्यांनी वस्तुस्थिती मांडली की, अनेकांना अजूनही भूखंड मिळालेले नाहीत. (पान २ वर..)

### सिडकोच्या गैरप्रकारांकडे शासनाचे वेधले लक्ष

या चर्चेद्वारे त्यांनी सिडकोमधील विविध स्तरांवर सुरू असलेल्या गैरप्रकारांकडे शासनाचे लक्ष वेधले. १२.५ टक्के भूखंड परतावा योजना, सिडकोच्या पाणीपुरवठा व्यवस्था, गृहनिर्माण योजना, नैना प्रकल्प, भूखंड वाटप, बांधकाम परवानग्या तसेच कंत्राट वाटप या सर्वच क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. या सर्व बाबींमुळे सर्वसामान्य नागरिक तसेच प्रकल्पग्रस्त शेतकरी यांना न्याय मिळत नसून त्यांच्या हक्कांवर गदा आणण्याचे काम सिडकोचे एमडी, जॉईंट एमडी करत असल्याचा घणाघात त्यांनी करून विधिमंडळात सिडकोच्या कारभाराचे वाभाडे काढले.

# महाराष्ट्रात पेट्रोल, डिझेलचा पुरेसा साठा -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. राज्यात पेट्रोल-डिझेलचा पुरवठा नियमित आहे. नागरिकांनी अफवांकडे दुर्लक्ष करावे; असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील जनतेला केले आहे. राज्यात काही ठिकाणी पेट्रोल-डिझेल संपल्याच्या अफवा पसरल्या. यानंतर पेट्रोल, डिझेल भरून घेण्यासाठी पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. अनेक पेट्रोल पंपांवर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली.



या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी एक्स पोस्ट अर्थात ट्वीट करून जनतेला विश्वासात घेतले आहे. पश्चिम आशियात अमेरिका आणि इस्रायल विरुद्ध इराण असे युद्ध २८ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या हवाई हल्ल्यांना इराणकडून प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न सुरू आहे. युद्धाने २६ व्या दिवसांत प्रवेश केला आहे. होर्मुझ सामुद्रधुनी शत्रू देशांसाठी बंद ठेवणार, असा इशारा इराणने दिला आहे. जे युद्धात शत्रू अथवा शत्रूचे सहकारी म्हणून सहभागी झालेले नाहीत त्यांच्या जहाजांसाठी होर्मुझ सामुद्रधुनी खुली आहे.

फक्त इराण सरकारशी समन्वय साधून आणि नियमांचे पालन करत संबंधित देशांच्या जहाजांना होर्मुझ सामुद्रधुनीतून प्रवास करता येईल असेही इराणने जाहीर केले आहे. भौगोलिक स्थितीचा फायदा घेत इराणने युद्ध होर्मुझ सामुद्रधुनी परिसरावर नियंत्रण ठेवले आहे. जगाच्या एकूण तेल व्यापारापैकी २० टक्के व्यापार होर्मुझ सामुद्रधुनीच्या मार्गाने जाते. यामुळे होर्मुझद्वारे केलेल्या कोंडीचा परिणाम हळू हळू जगावर दिसू लागला आहे.

या परिणामांच्या बातम्या येत असतानाच राज्यात पेट्रोल-डिझेल संपल्याच्या अफवा पसरण्यास सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. राज्यात पेट्रोल-डिझेलचा पुरवठा नियमित आहे. नागरिकांनी अफवांकडे दुर्लक्ष करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

## निवडक

### पीएनजी असलेल्या भागात एलपीजी पुरवठा होणार बंद

**नवी दिल्ली :** देशातील ऊर्जा साखळीत मोठी सुधारणा करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. ज्या भागात पाइपद्वारे नैसर्गिक वायू (पीएनजी) उपलब्ध आहे, अशा ठिकाणी घरगुती गॅस ग्राहकांनी पीएनजी जोडणी घेणे आता अनिवार्य करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, पीएनजीची सुविधा उपलब्ध असूनही ज्या कुटुंबांनी ही जोडणी घेतलेली नाही, त्यांचा एलपीजी सिलिंडरचा पुरवठा तीन महिन्यांनंतर कायमचा खंडित केला जाईल, असा स्पष्ट आदेश केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने जारी केला आहे.

### १ एप्रिलपासून लागू होणार नवे आयकर नियम

**नवी दिल्ली :** येत्या १ एप्रिलपासून नवा आयकर कायदा, २०२५ लागू होणार आहे. याच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने त्याशी सुसंगत असे नवे आयकर नियम जाहीर केले आहेत. काही तज्ज्ञांच्या मते आयकर कायदा २०२५ च्या कलम २०२ अंतर्गत असलेल्या नवीन कर प्रणालीच्या तुलनेत मध्यम उत्पन्न गटातील पगारदार कर्मचाऱ्यांसाठी जुनी कर प्रणाली अधिक फायदेशीर ठरू शकते.

# माथेरानमध्ये ई-रिक्षा संघटनेचे उपोषण अखेर मागे



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील हातरिक्षा बंद करून पर्यावरण पूरक ई-रिक्षा देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. ६ ऑगस्ट २०२५ मध्ये दिलेल्या निर्णयात न्यायालयाने स्पष्ट नमूद केले होते की पुढील सहा महिन्यांत येथील हात रिक्षा सारखी अमानवीय प्रथा बंद करून सर्व ९४ हात रिक्षा चालकांचे ई-रिक्षाच्या माध्यमातून पुनर्वसन करावे, मात्र अद्यापही या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याने सनियंत्रण समितीच्या निषेधार्थ श्रमिक रिक्षा संघटना २३ मार्चपासून उपोषणला बसली होती.

यामध्ये एकूण २२ उपोषणकर्ते उपोषणाला बसले होते. यामध्ये काही उपोषण कार्त्यांची प्रकृती बिघडली असून त्यांना स्थानिक बी.जे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अखेर अधिकारी वर्गाच्या मध्यस्तीनंतर उपोषण मागे घेण्यात आले असून पुढील पंधरा दिवसांत सनियंत्रण समिती सोबत बैठक घेऊन मागण्या मान्य केल्या जातील असे आश्वासन यावेळी अधिकारी वर्गाकडून संघटनेला देण्यात आले.

श्रीराम चौकात श्रमिक रिक्षा संघटनेचे २२ सदस्य उपोषणास बसले होते. त्यापैकी काहींची प्रकृती आता खालावली असून उपोषणस्थळी डॉक्टरांना पाचारण करावे लागले. माथेरान अधीक्षक सुरेंद्रसिंग ठाकूर, नगरपालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे, माथेरान पोलीस निरीक्षक सरिता मुसळे यांनी उपोषण स्थळी भेट देऊन श्रमिक रिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, नगरसेवक मनोज खेडकर, माजी नगरसेवक प्रदीप घावरे, कुलदीप जाधव आणि उपोषणकर्ते दिनेश सुतार यांनी सर्व अधिकारी वर्गासोबत चर्चा करून पंधरा दिवसांत सर्व मागण्या मान्य करून सगळ्या ९४ ई-रिक्षा सुरू कराव्यात असे सांगितले.

# देशात १०० विमानतळे, २०० हेलीपॅड होणार

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बुधवारी झालेल्या बैठकीत देशाच्या विमान वाहतूक, इमिग्रेशन आणि पर्यावरणाशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांमध्ये देशभरात १०० नवीन विमानतळ उभारण्यास मंजुरी, उडान २.० योजनेचा विस्तार, तसेच परदेशी नागरिकांच्या व्हिसा आणि ट्रॅकिंग प्रणालीची योजना २०३१ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रत्येक विमानतळासाठी सरासरी सुमारे १०० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, या प्रकल्पासाठी सरकारने १२ हजार १५९ कोटी रुपयांचा बजेट निश्चित केला आहे. हे विमानतळ चॅलेंज मोडमध्ये उभारले जाणार आहेत. म्हणजेच, ज्या राज्य किंवा शहराकडून जमीन सुरक्षा व्यवस्था, आवश्यक सुविधा लवकर आणि चांगल्या पद्धतीने उपलब्ध करून दिल्या जातील, त्या ठिकाणांना विमानतळासाठी प्राधान्य दिले जाईल.

सरकार देशभरात २०० नवीन आधुनिक हेलीपॅड उभारणार आहे. विशेषतः डोंगराळ भाग, ईशान्य भारत आणि बेट क्षेत्र येथे रस्ते बांधणे कठीण आहे, तिथे हेलिकॉप्टर हा मुख्य वाहतूक पर्याय बनवण्याचा सरकारचा उद्देश आहे. या प्रकल्पासाठी ३ हजार ६६१ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.



# कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सल्लागारपदी लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सल्लागारपदी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. रत्नागिरीच्या मालगुंड येथील कवी केशवसुत स्मारकात कोकण मराठी साहित्य परिषदेच्या केंद्रीय कार्यकारिणीची बैठक झाली. या बैठकीत कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, अध्यक्षा नमिता कीर, कार्याध्यक्ष डॉ.प्रदीप ढवळ यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची ही निवड केली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांची निवड झाल्याबद्दल कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्ह्याकडून अभिनंदन करण्यात आले.केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी,ज्येष्ठ साहित्यिक, कोमसाप नवीन पनवेल शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मढवी तसेच एडवोकेट मनोज म्हात्रे, कवी गणेश म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, श्याम पुंडे, संजय गोडसे, भालचंद्र जुमलेदार, समीर वेश्वीकर आदींनी प्रत्यक्ष भेटून अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी पाच वर्षांत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची विद्यार्थी संख्या दोन हजारांवर पोहचेल आणि हे विद्यालय आधुनिक व दर्जेदार शिक्षणाच्या जोरावर महाराष्ट्रातील एक नामांकित शाळा म्हणून नावारूपास येईल, असा विश्वास लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्कूलच्या द्वितीय वार्षिक पारितोषिक वितरण समारंभावेळीव्यक्त केला.

केवळ विद्यार्थी संख्या वाढवणे हे आमचे उद्दिष्ट नसून, विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या सोयी-सुविधा आणि आधुनिक शिक्षण देऊन त्यांना सर्वच क्षेत्रांत प्रगतीशील बनवण्यासाठी संस्था प्रयत्नशील असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. जनार्दन भगत शिक्षण प्रसार संस्थेच्या उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा द्वितीय वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ बुधवारी अत्यंत उत्साहात पार पडला.

या सोहळ्यात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक आणि सह-पाठ्यक्रम स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन गौरव करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉक्टर एस.टी. गडदे, सदस्य ॲडव्होकेट राहुल घरत, प्राचार्या निशा नायर, प्राचार्य किरण कुमार सुथार, प्रणिता गोळे, दिपाली म्हात्रे आदींसह शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यात २२ हजार ३७५ 'लाडकीं'ची ई-केवायसी प्रलंबित

**रायगड : रामप्रहर वृत्त**

लाडकी बहीण योजनेंतर्गत जिल्ह्यात एकूण ६३ हजार ७८२ महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली होती, परंतु तांत्रिक कारणांस्तव ती प्रक्रिया चुकीची किंवा अपूर्ण असल्याचे आढळून आले आहे. सध्या २२ हजार ३७५ महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पुन्हा पूर्ण केलेली नाही. त्यामुळे संबंधित लाभार्थींना योजनेचा लाभ मिळण्यास अडथळा निर्माण होत आहे.

याकरिता लाभार्थी महिलांना तत्काळ https://ladakibahin.maharashtra.gov.in, या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ३१ मार्च २०२६ पूर्वी आपली ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीकांत हावळे यांनी केले आहे.

तालुकानिहाय प्रलंबित ई-केवायसी प्रकरणांची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे. अलिबाग- २ हजार ६३३, कर्जत-१ हजार ९६२, खालापूर- १ हजार ७७२, महाड- १ हजार ६५६, माणगाव- १ हजार ७९९, म्हसळा-८०८, मुरुड-७१३, पनवेल-५ हजार १४०, पेण-१ हजार ५३३, पोलादपूर- ४२७, रोहा-८४४, श्रीवर्धन- ७८७, सुधागड-पाली-४८९, उरण-१ हजार ३७६, तळा-४३६.

तसेच ई-केवायसी करताना अडचणी येत असल्यास संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. निर्धारित मुदतीत ई-केवायसी पूर्ण न केल्यास योजनेंतर्गत मिळणारा लाभ बंद होऊ शकतो, याची लाभार्थींनी नोंद घ्यावी.

# गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी नवे प्राधिकरण स्थापन करणार -मंत्री शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी व्यापक पावले उचलली जात असून युनेस्को मानांकन मिळालेल्या गडकिल्ल्यांच्या व्यवस्थापनासाठी तसेच असंरक्षित किल्ल्यांच्या जतनासाठी स्वतंत्र किल्ले संवर्धन प्राधिकरण स्थापन करणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा नियम २९३ अन्वये सांस्कृतिक कार्य विभागासंदर्भात झालेल्या चर्चेला उत्तर देताना सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले, "मराठा मिलिटरी लँडस्केप ऑफ इंडिया" या संकल्पनेअंतर्गत छत्रपती शिवाजी



महाराजांच्या १२ गडकिल्ल्यांना युनेस्कोचे जागतिक मानांकन मिळाले आहे. या किल्ल्यांसाठी स्थळ व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येत असून माहिती फलक, जनसुविधा केंद्र, माहिती केंद्र आणि पर्यटन सुविधा उभारण्याचे काम हाती घेतले जाणार आहे.

इतिहास जतन करण्याच्या दृष्टीने नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक रघुजी भोसले प्रथम यांची ऐतिहासिक तलवार लिलावातून खरेदी करण्यात आली असून ती नागरिकांच्या दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. सध्या ही तलवार नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयात ठेवण्यात आली असून पुढे मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयातही प्रदर्शित केली जाणार आहे, असे त्यांनी सांगितले.

सार्वजनिक गणेशोत्सवाला जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू असून, तो युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी केंद्र सरकारच्या सहकार्याने प्रस्ताव सादर केला जाणार असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले.

# नवी मुंबई विमानतळाची कनेक्टिव्हिटी वाढणार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



नवी मुंबई विमानतळ माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या दिवशी म्हणजे २५ डिसेंबर २०२५ रोजी सुरू झाला. या विमानतळावरून २९ मार्च २०२६ पासून दररोज ७६ विमानसेवा उपलब्ध होणार आहेत. विमानसेवांची संख्या वाढत असल्यामुळे नवी मुंबई विमानतळावरील प्रवासी वर्दळही वाढणार आहे. या प्रवाशांच्या सोयीसाठी नवी मुंबई विमानतळाची कनेक्टिव्हिटी वाढवण्याचे नियोजन वेगाने सुरू आहे. विमानतळावर एक पॅसेंजर इंटरजेंज तयार करण्याचे नियोजन आहे. या इंटरजेंजद्वारे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ चार मेट्रो मार्गिकांशी जोडला जाईल.

मुंबई शहर ते नवी मुंबई अशी धावणार असलेली मेट्रो ८ नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडली जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनस दोनपासून ही मार्गिका सुरु होईल आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडली जाईल. मेट्रो आठ वरील स्थानकावर मेट्रो ७ आणि मेट्रो ३ ला जोडणी मिळेल. मेट्रो आठवरून प्रवाशांना मेट्रो ४, मेट्रो २ आणि नवी मुंबई मेट्रो लाईन १ साठी इंटरचेंज मिळणार आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला चार मेट्रो मार्गिकांशी जोडणी मिळाल्यामुळे प्रवासी मेट्रोद्वारे कुर्ला, लोकमान्य टिळक टर्मिनस, मानखुर्द येथील आंतरराज्य बस टर्मिनसपर्यंत पोहोचू शकतील. सध्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला कोणतेही रेल्वे स्थानक आणि मेट्रो स्थानक नाही. त्यामुळे प्रवाशांना रिक्षा, टॅक्सी, कॅब हे खर्चिक पर्याय वापरूनच विमानताळवर पोहोचता येते अथवा विमानतळावरून पुढे घराच्या अथवा हॉटेलच्या दिशेने प्रवास करावा लागतो. यात वेळ आणि पैसा मोठ्या प्रमाणात खर्च होत होता.

# महाडमध्ये अतिक्रमण हटाव मोहीम; पोलीस संरक्षणात प्रशासन रस्त्यावर

**महाड : प्रतिनिधी**



महाड शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेला अखेर नगरपरिषद प्रशासनाला मुहूर्त सापडला.बुधवारी महाड नगरपालिकेने अतिक्रमण हटाव मोहिमेस जोरदार प्रारंभ करण्यात आला. नपाचे बांधकाम अभियंता प्रविण कदम व जवळपास तीस कर्मचारी, पोलीस बंदोबस्तात या मोहिमेसाठी रस्त्यावर उतरले होते.

महाड शहरातील अनधिकृत दुकाने, टपऱ्या व इतर अतिक्रमणांमुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत होत्या. प्रशासनाकडून या कारवाईचे नियोजन चालू करण्यात आले होते. बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच एसटी बस स्थानक परिसरातील अतिक्रमणे जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आली.या अतिक्रमणांमुळे लायन्स क्लब ते छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि भगवानदास बेकरी परिसराला बकाल स्वरूप आले होते. बुधवारी झालेल्या कारवाईमुळे शहरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतल्याचे चित्र पाहायला मिळाले.

कारवाईपूर्वी संबंधित व्यावसायिकांना नोटिसा देण्यात आल्याची माहिती मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांनी दिली. कारवाईवेळी मुख्याधिकारी धनंजय कोळेकर, पोलीस निरीक्षक संदीप भोसले, बांधकाम अभियंता प्रवीण कदम, पाणीपुरवठा विभागाचे रोहित भोईर यांच्यासह नगरपरिषद कर्मचारी, महिला कर्मचारी, सफाई कर्मचारी तसेच पोलिसांचा मोठा फौजफाटा दिसून आला.

कारवाईत होत असलेल्या विलंबामुळे नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. राजकीय हस्तक्षेपामुळे ही मोहीम रखडल्याची चर्चा होती,मात्र प्रत्यक्ष कारवाई सुरू झाल्यानंतर नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून ही मोहीम सातत्याने सुरू राहावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, काही राजकीय पदाधिकाऱ्यांनी या कारवाईचे स्वागत केले मात्र गोरगरिबांच्या व्यवसायावर कारवाई करताना श्रीमंतांच्या अनधिकृत बांधकामांवरही समान कारवाई करण्याची मागणी केली आहे.एकंदरीत, नगरपरिषद प्रशासनाने उचललेले हे पाऊल महत्त्वाचे मानले जात असले तरी भविष्यात अशा अतिक्रमणांना आळा घालण्यासाठी कायमस्वरूपी ठोस नियमावलीची गरज आहे.

# लोकसहभागातून होणार डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसहभागातून महानगरपालिकेतर्फे दिनांक १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पनवेल शहरामध्ये भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित नियोजन बैठकीत उत्सवाच्या सर्व तयारीची रूपरेषा निश्चित करण्यात आली.

यावेळी महापौर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठकीस आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, महानगरपालिका सदस्य हरिष केनी, तुषार पाटील, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी मिरवणूक, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, सुरक्षाव्यवस्था, स्वच्छता व विविध सुविधा याबाबत नियोजनविषयक चर्चा करण्यात आली. मिरवणुकीसाठी रुग्णवाहिका, थंडपाणी, अल्पोपहार, एनर्जी ड्रिंक, सुरक्षा रक्षक, लाईट व्यवस्था आणि स्वच्छतेची विशेष काळजी घेतली जाणार असल्याची माहिती यावेळी परिवहन व्यवस्थापक गावडे यांनी दिली. यावेळी उपस्थित नागरिकांच्या सूचना घेऊन त्याविषयी चर्चा झाली. महापौर, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते यांनी यावेळी आपले विचार मांडले तसेच सूचना दिल्या. मुख्य जनसंपर्क अधिकारी राजू पाटोदकर यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

जयंती निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व, निबंध, चित्ररथ इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रे व स्मृतिचिन्हे देण्यात येणार आहेत. शहरातील प्रमुख चौकांमध्ये फ्लेक्स, बॅनर व विद्युत रोषणाईसह आकर्षक सजावट केली जाणार आहे. दोन्ही बाजूंना लाईटची व्यवस्था करण्यात येणार आहे.

**मिरवणूक नियोजन**

जयंतीच्या दिवशी सकाळी ७ वाजता नागरिकांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ एकत्र जमून, पुष्पहार अर्पण केला जाईल. यावेळी पाठपूजा करुन मानवंदना दिली जाईल. यानंतर सकाळी ७.२० वाजता पुतळ्याजवळून भव्य मिरवणुकीला प्रारंभ होईल. मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक, एम.टी.एन.एल. रोड, संत जगनाडे महाराज चौक, रोहिदास वाडा, टपाल नाका, कर्नाळा सर्कल, भाजी मार्केट त्यानंतर नाट्यगृहात

## सुर्वे मास्तरांचे साहित्य संमेलन २७, २८ रोजी रवींद्र नाट्य मंदिरात

### केदार शिंदे संमेलनाध्यक्ष

**मुंबई, :** स्वामीराज प्रकाशन आयोजित "सुर्वे मास्तरांचे साहित्य संमेलन" यंदा २७ आणि २८ मार्च रोजी रवींद्र नाट्य मंदिर लघु नाट्यगृहात संपन्न होणार आहे. गिरणगावातील प्रसिद्ध लेखक दिग्दर्शक केदार शिंदे या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असतील. दुपारी ३ ते रात्री १० या वेळेत दोन दिवसात कवी नारायण सुर्वे यांच्या स्मृतींचा जागर होणार असून रसिकांना संमेलनात मुक्त प्रवेश आहे. संमेलनाचे हे दुसरे वर्ष आहे. संमेलनाचे उद्घाटन सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते होणार असून लालबागचे नगरसेवक किरण तावडे हे स्वागताध्यक्ष आहेत. समारोप सोहळ्याचे अध्यक्षस्थान मराठी भाषा मंत्री उदय सामंत भूषविणार आहेत.

या दोन दिवसीय साहित्य संमेलनात सुर्वे मास्तरांच्या कविता आणि गिरणगाव यावर सांगोपांग चर्चा होणार आहे. अशोक नायगावकर, महेश केळुसकर, अशोक बागवे, संतोष पवार, बजरंग चव्हाण, कपिल भोपटकर, सुभाष नकाशे, हेमंत भालेकर, जयेंद्र साळगावकर, दिनेश केळुसकर, अभिनेता स्वप्नील राजशेखर, दिग्दर्शक विवेक देशपांडे आदी अनेक मान्यवर विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. यावेळी गिरणगावातील कवींचेही संमेलन होणार आहे. शिवाय मास्तरांच्या कवितांवरील "चंद्रा" या नाटकाचे आणि "आमच्या या घरात" या नाटकाचे साभिनय अभिवाचन होणार आहे. "ढाकुमाकुम टाकुमाकुम" या सांगीतिक कार्यक्रमाने संमेलनाची सांगता होईल. या संमेलनात गिरणगावकरांनी आणि सर्व साहित्य रसिकांनी आवर्जून सहभागी व्हावे, असे आवाहन स्वामीराज प्रकाशन या संस्थेने केले आहे.

# सरस प्रदर्शन व विक्री महोत्सवाची सांगता : १३९ विविध पुरस्कारांचे वितरण

**अलिबाग : प्रतिनिधी**



ग्रामविकास व पंचायतराज विभाग, उमेद-राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा विकास यंत्रणा, रायगड जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित मिनी सरस व जिल्हास्तरीय सरस प्रदर्शन व विक्री महोत्सवाची मंगळवारी ( दि. २४ ) सांगता झाली.

यावेळी महाआवास अभियानांतर्गत जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण, माझी वसुंधरा अभियानांतर्गत पुरस्कार वितरण, टीबीमुक्त ग्रामपंचायत अभियान पुरस्कार, निक्षय मित्र पुरस्कार तसेच मिनी व जिल्हास्तरीय सरस महोत्सवाच्या आयोजनात उत्कृष्ट योगदान दिलेल्या कर्मचा-यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

सांगता समारंभास कार्यक्रमाला अभिनेते भाऊ कदम आणि अभिनेत्री संजना काळे, राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे, आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील, सभापती वैकुंठ पाटील, यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, उपसभापती, सदस्य, सरपंच, गटविकास अधिकारी उपस्थित होते.

राजिपचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर म्हणाले, आज रायगडातील ग्रामपंचायती शासनाच्या विविध अभियानांमध्ये सहभागी होउन पुरस्कारही मिळवत आहेत, ही अत्यंत अभिमानाचा गोष्ट आहे.


**कागदपत्रे हरविलेबाबत**

मी, श्री. सुभाष लक्ष्मण धामणे रा. चिंतन अपार्टमेंट, रुम नं. ५०४, प्लॉट नं. ४११, तक्का, ता. पनवेल, जि. रायगड.

माझेकडून २३ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता प्रवास करीत असताना तक्का परिसरात खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे दि.२५/०३/२०२६ रोजी मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. ०५५२/२०२६ हा आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. ओरिजनल शेअर सर्टीफिकेट नं. ५००१ ते ५००५

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ९८९२२६८६८९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

दिनांक : २५/०३/२०२६

सही/-

श्री. सुभाष लक्ष्मण धामणे


## पान १ वरुन

### सिडको अधिकाऱ्यांवर कारवाई होणार -मंत्री गोगावले

सिडकोकडून जागेची उपलब्धता नसल्याचे कारण दिले जाते, मात्र विक्रीसाठी भूखंड उपलब्ध होत असताना प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसाठी ते का उपलब्ध होत नाहीत, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. ज्यांच्या जमिनीवर नवी मुंबई उभी राहिली, त्यांच्या हक्कांचा व भावनांचा सिडकोकडून विचार का केला जात नाही, अशी तीव्र भावना त्यांनी व्यक्त केली.

या विषयावर यापूर्वीही विधानसभेत तीन वेळा आश्वासने देण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात ठोस अंमलबजावणी दिसून येत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. अधिवेशनात या प्रश्नासंदर्भात लक्षवेधी सूचनेमार्फत अथवा अन्य मार्गाने लक्ष वेधून, शासनाने आश्वासन देऊनदेखील सिडको प्रशासनाला काडीमात्र फरक पडत नाही. जागेच्या उपलब्धतेचे कारण देऊन, उपलब्ध जागेत भूखंडाचे वाटप करण्याकरिता अधिकायांकडून लाखों-करोडो रुपये घेण्यात येतात. त्यामुळे सर्वसामान्य प्रकल्पग्रस्त शेतकरी वंचितच रहात आहे.त्यामुळे संबंधित प्रकरणात जबाबदारी निश्चित करून वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी, तसेच वेळबद्ध कार्यक्रम जाहीर करून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी ठाम मागणी आमदार महेश बालदी यांनी सरकारकडे केली.

सातत्याने पाठपुरावा करूनदेखील सिडको प्रशासन अजिबात पाणीपुरवठा हा विषय गांभीर्याने घेत नाही. वर्षानुवर्षे तीच उत्तरे आणि काहीही उपाययोजना केली जात नाही. टँकर माफियांकरिता पाणीपुरवठा खाते काम करते, सर्वसामान्य लोकांशी यांना काहीही देणेघेणे नाही. अस्तित्त्वातील नागरिकांना पाणी देता येत नाही, पण सतत नवीन बांधकामांना परवानगी दिली जाते. त्यामुळे पाण्याचा प्रश्न संपूर्णपणे सुटेपर्यंत नवीन सीसी ओसी देण्यात येऊ नये, अशी आग्रही मागणी आमदार महेश बालदी यांनी केली. विमानतळ प्रभावित नैना परिक्षेत्रातील शेतकऱ्यांचा आवाजही त्यांनी सभागृहात बुलंद केला. नियोजनबद्ध विकास करण्यासाठी २०१३ साली शासनाने विमानतळ प्रभावित क्षेत्राकरिता नियोजन प्राधिकरण म्हणून नैना प्राधिकरणाची स्थापना केली. परंतु गेल्या १३ वर्षांत काहीही सकारात्मक काम झालेले नाही. सातत्याने बैठकांद्वारे, पत्रांद्वारे शेतकऱ्यांच्या समस्या मांडूनदेखील सिडको प्रशासन सकारात्मक प्रतिसाद देताना दिसत नाही. एमडी जॉईंट एमडी सारखे वरिष्ठ अधिकारी अत्यंत आडमुठी व शेतकरी विरोधी भूमिका घेत असतात. त्यामुळे नैना प्रकल्पाविरोधात शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. विशेष म्हणजे सिडकोकडे अभियांत्रिकी व नियोजन विभागात शेकडो अधिकारी असतानाही नैनासाठी सल्लागार कंपनी म्हणून तब्बल १२०० कोटी कन्सल्टंसी दिले आहे. नैना प्रकल्पासाठी सल्लागार कंपनीला तब्बल १२०० कोटी रुपये देण्यात आल्याचा उल्लेख करतानाच शेकडो अधिकारी असतानाही एवढा मोठा खर्च का, असा सवाल उपस्थित करत मोठ्या भ्रष्टाचाराची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

स्वप्नांचे शहर नवी मुंबईत आपल्या हक्काचे घर या गोंडस नावाखाली सिडको पंतप्रधान आवास योजना तसेच अन्य गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत अल्प व अत्यल्प गटाकरिता घरे तयार करीत आहे. जवळपास ९० हजार घरे निर्माण होत असून या प्रकल्पातील पाणीपुरवठा, सुरक्षा, लिफ्ट, इमारतीचे मेंटेनंस यासारख्या समस्यांकडे सिडकोचे अधिकारी लक्ष देत नाहीत. घरे बांधण्यासाठी सिडकोचे अधिकारी कर्मचारी सखम असतानाही या ठिकाणीही सल्लागार कंपनी नेमून त्या कंपनीला शेकडो कोटी रुपये दिले जात आहे त्यामुळे याठिकाणीही भ्रष्टाचार बोकाळला आहे. १२. टक्के भूखंड विभागाप्रमाणेच सिडकोचा बांधकाम परवानगी विभाग भ्रष्टाचाराचे कुरण झाले आहे. बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र मिळवण्याकरिता मीटरप्रमाणे पैसे मोजावे लागतात. पैसे घेताना ते चटईक्षेत्र निर्देशांकानुसार आकारले जातात. त्यामुळे लाखो रुपये दिल्याशिवाय सिडकोकडून फाईल जागेवरून हलतच नाही. त्याचप्रमाणे युडीसीपीआर प्रमाणे अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक मिळवण्याकरिता देखील लाखो रुपये द्यावे लागतात आणि त्याशिवाय कामच होत नाही. असा सनसनाटी खुलासा करत सिडकोच्या कारभाराचे वाभाडे काढले.

अनेक ठिकाणी सिडकोने जमीन संपादित केलेली नसतानादेखील लाखो रुपये घेऊन अनेक व्यावसायिकांना भूखंडाचे वाटप करण्यात असल्याचेही त्यांनी नमूद केले. मा. मुख्यमंत्री महोदयांनी विकसित तिसऱ्या मुंबईबद्दल त्यांचे व्हिजन सांगितले आहे. त्यादृष्टीने या परिसरांत नवीन एज्यु सिटी; 'स्पोर्टस् सिटी, मेडिसिटी' अशा अनेक नवीन संकल्पना प्रत्यक्षात आणण्याकरिता काम करण्याबाबत योजना आहे. परंतु याकरिता जमिनीचे अधिग्रहण, तेथील शेतकऱ्यांच्या समस्या याबाबतीत सिडको प्रशासनाकडून काय चालू आहे, याबद्दल काहीही माहिती दिली जात नसल्याचे त्यांनी सांगत सिडकोच्या दुर्लक्षपणाचा आणखी एक मुद्दा ऐरणीवर आणला. त्याचबरोबरीने उलवे आणि आजूबाबूच्या परिसरांत् मुंबईतून मोठ्या प्रमाणावर अनधिकृतरित्या डेब्रिज डंपिंग केले जात असून, वारंवार तक्रार करूनदेखील सिडकोतर्फे कारवाई केली जात नाही. डंपिंगचे डोंगर तयार झाल्यामुळे इथल्या नागरिकांच्या सुरक्षतेच व आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याची बाबही त्यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिली. त्याचबरोबर डेब्रिजच्या बाबतीत दिल्या जाणाऱ्या कंत्राटांमध्येही मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असून त्याचीही चौकशी होण्याची मागणी त्यांनी केली.

प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी घरे नियमित करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने सप्टेंबर २०२४ मध्ये निर्णय घेऊनसुद्धा सिडकोतर्फे कुठलीही अंमलबजावणी आजतागायत होत नाही. त्यामुळे अनधिकृत विभागांतील अधिकारी, कर्मचारी सरसकट प्रकल्पग्रस्तांच्या बांधकामांना नोटीस पाठवतात. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये घबराट निर्माण होते. त्याचा फायदा घेऊन कारवाई न करण्यासाठी हे अनधिकृत विभागाचे कर्मचारी अक्षरशः लाखो रुपये घेत असतात. वर्षानुवर्षे हा प्रकार चालू आहे. एकंदरीत सिडकोच्या जवळपास सर्व विभागांत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार बोकाळला असून, सिडकोमध्ये केवळ एजेंट व व्यावसायिकांचे राज्य चालत आहे. सर्वसामान्यांना काहीही किंमत राहिलेली नाही. हे सर्व अव्याहतपणे चालू असताना, उच्चपदस्थ अधिकारी त्याबाबत काही करत नाहीत, त्यामुळे त्यांच्या संगनमताने तर हा सर्व प्रकार चालू आहे का ? अशी शंका नागरिक उपस्थित करत आहेत.

याबाबत ठोस व कडक उपाययोजना करून सर्वसामान्यांना न्याय मिळणे अपेक्षित असून या पार्श्वभूमीवर, शासनाने या प्रकरणांची गांभीर्याने दखल घेऊन संपूर्ण सिडको कारभाराची उच्चस्तरीय चौकशी करावी, दोषींवर कठोर व कायदेशीर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या अनियमितता टाळण्यासाठी पारदर्शक, जबाबदार आणि लोकाभिमुख काम झाले पाहिजे अशी ठोस मागणी आमदार महेश बालदी यांनी विधानसभेत केली.

सिडको महामंडळाच्या कारभारातील विविध मुद्द्यांवर आमदार महेश बालदी यांनी विधानसभेत अत्यंत ठाम आणि पोटतिडकीने आवाज उठवला. त्यांनी मांडलेल्या प्रश्नांवर उत्तर देताना मंत्री भरतशेठ गोगावले यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर स्पष्ट भूमिका मांडत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचे संकेत दिले. आमदार महेश बालदी यांनी मांडलेले मुद्दे व सिडकोच्या कामकाजातील त्रुटींचे सखोल अवलोकन केल्याचे मंत्री गोगावले यांनी नमूद केले. यावेळी सिडकोचे संबंधित अधिकारी सभागृहात अनुपस्थित असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त करत, सिडको प्रशासनाने याबाबत खुलासा देणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. सभागृह उशिरापर्यंत सुरू असताना मंत्री, आमदार आणि अध्यक्ष उपस्थित असतानाही अधिकारी गैरहजर राहणे ही गंभीर बाब असल्याचे सांगत, अशा अधिकाऱ्यांविरुद्ध निश्चितच कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

यावेळी १२.५ टक्के भूखंड वाटपाचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा असल्याचे अधोरेखित करत मंत्री गोगावले म्हणाले की, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी आपली जमीन दिली नसती तर सिडको अस्तित्वातच आली नसती. त्यामुळे त्यांच्या हक्कांबाबत कोणतीही तडजोड होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. आमदार महेश बालदी यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा होणे आवश्यक असून यासाठी संबंधित मंत्री, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक (एमडी) आणि इतर अधिकाऱ्यांची तातडीने बैठक आयोजित करण्यात येईल, असे आश्वासनही मंत्री गोगावले यांनी दिले.


मा. बडगुजर साहेब SD, पनवेल

**पनवेल येथिल मे.दिवाणी न्यायाधिश व. स्तर पनवेल यांचे न्यायालयात**

नि.क्र. २३/ड

ने.ता. २७/०३/२०२६

दिवाणी चौकशी अर्ज क. १७८८ / २०२१

**जाहीर नोटीस**

श्रीमती. लता आनंद चव्हाण व इतर ३ ................ **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ............................................ **जाबदार**

सर्व लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की,
ज्यापेक्षा कै. आनंद श्रीपत चव्हाण यांचे दिनांक २४/१०/२०१६ रोजी जे. जे. हॉस्पिटल, मुंबई येथे मयत झाले असून अर्जदार प्रस्तुतचे अर्जदार क्र. १ हया पत्नी, अर्जदार क्र. २ ते ३ हया मुली, व अर्जदार क्र. ३ हा मुलगा असून त्यांचे कायदेशिर वारस आहेत. सदर वारस हे वृदांवन 'बी' को-ऑप हौसिंग सोसायटी फ्लॅट क्र. ३०६, अे विंग, प्लॉट क्र. २९/४१, सेक्टर नं. ०९, खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६ येथे राहत असून सदर मयताच्या नावे खालीलप्रमाणे मिळकत आहे.

**मिळकत**

| अनु.क्र. | मिळकत |
|---|---|
| १. | वृदांवन 'बी' को-ऑप हौसिंग सोसायटी फलॅट क्र. ३०६, अे विंग, प्लॉट क्र. २९/४१, सेक्टर नं. ०९, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि. रायगड - ४१०२०६ |

वरील अर्जदार हे मयत कै. आनंद श्रीपत चव्हाण, यांचे वारस आहेत, या हक्कबद्दल कोणीही व्यक्तीला हरकत असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, या मे. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा कार्यवाही करील.

तसेच अर्जदार हे कै. आंनद श्रीपत चव्हाण, यांचे वारस असल्याने शाबीत झाले तर त्यांस वारसादाखला मंजूर करील यांची दखल घ्यावी.

आज दिनांक १६/०३/२०२६ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/-
क. लिपिक

कोर्टाचा शिक्का

सही /-
सहा अधिक्षक
दि. न्या. व स्तर, पनवेल

## निवडक

### उरण येथे श्री राम जन्मोत्सव



**उरण :** उरण बाजार पेठेतील श्री राम मंदिरात गुरुवारी (दि. २६) श्री राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे, असे श्री राम मंदिराचे ट्रस्टी चंद्रकांत ठक्कर यांनी सांगितले. सकाळी काकड आरती, ह.भ.प.सुधीर बाळ (डोंबिवली) यांचे कीर्तन, दुपारी श्रीराम जन्म , नाहणी, पाळणा, आरती, सायंकाळी श्री गुजराती महिला सत्संग मंडळ यांचे भजन, रात्री ९ ते १० .३० वाजेपर्यंत पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. पालखी मिरवणूक सोबत श्री गजानन प्रासादिक भजन मंडळ यांची भजने होणार आहेत.श्री राम जन्मोत्सवात श्री राम मंदिराचे ट्रस्टी चंद्रकांत ठक्कर, आमदार महेश बालदी, कौशिक शाह, सदानंद गायकवाड, निले ठक्कर, विक्रम ठक्कर, नगरसेवक राजेश ठाकूर, पालू भिंडे, अजित भिंडे, वसंत ठक्कर, गणेश सेवक, पुरोशोत्तम सेवक, उमाकांत ठक्कर, ईश्वर भाई ठक्कर आदींचे सहकार्य मिळणार आहे.

---



**पनवेल : पटेल मोहल्ला येथील माहिरा अबुबकर नाखवा या नऊ वर्षीय चिमुरडीने रमजानचे संपूर्ण रोजे (उपवास) केले. त्याबद्दल तिचे कुटुंबियांसह नातेवाईकांनी कौतुक करून तिला रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.**

# पनवेल मनपातर्फे टीबी मुक्त अभियान

## १०० दिवसीय मोहिमेची दमदार सुरुवात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत १०० दिवसीय क्षयरोग मोहिमेचा उद्घाटन समारंभ मंगळवार, २४ मार्च २०२६ रोजी जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्य साधून आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे सायंकाळी ४ वाजता झाला.

केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्रीय स्तरावर मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमाचे ऑनलाईन पद्धतीने थेट प्रक्षेपण कार्यक्रम फडके नाट्यगृहात येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे तसेच नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे व उपायुक्त प्रसेनजीत कार्लेकर यांच्या हस्ते मान्यवरांचे तुळशीचे रोप देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी नागरी आरोग्य केंद्राकडून टीबी विषयक जनजागृतीपर नाट्यसादरीकरण करण्यात आले. यानंतर दीपप्रज्वल आणि जागतिक क्षयरोग दिनानिमित्त रॉबर्ट कॉच यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार या मोहिमेद्वारे क्षयरोग निर्मूलनासाठी प्रतिबंध, लवकर निदान, प्रभावी उपचार व जनजागृती यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करत पालिकेच्या सर्व नागरी आरोग्य केंद्रांवर याबाबत सुविधा उपलब्ध असून पनवेल मनपाकडे पाच अत्याधुनिक एक्स रे मशीन उपलब्ध असल्याची माहिती यावेळी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली.

यावेळी नि-क्षय मित्र संकल्पनेची माहिती देण्यात आली तसेच मागील कालावधीत विविध संस्था तसेच व्यक्तींनी क्षयरोग निर्मूलनासाठी दिलेल्या योगदानाचा विशेष उल्लेख करून यावेळी मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. तसेच प्रातिनिधिक स्वरूपात फूड बास्केट चे वितरण क्षयरोग रुग्णांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी सूत्रसंचालन क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड यांनी केले तर माता व बालसंगोपन अधिकारी डॉ गणेश नायर यांनी आभार व्यक्त केले.

**मान्यवरांकडून आरोग्य विभागाचे कौतुक**

क्षयरोग मुक्तीच्या दिशेने महापालिका अत्यंत दमदार पाऊले उचलत असून जागरूक लोकप्रतिनिधी व नागरिक, सक्षम आरोग्य सेवा, सामाजिक संस्थांचा उस्फुर्त सहभाग यांच्या साहाय्याने आपण निश्चित क्षयरोगमुक्तीचे ध्येय साध्य करू अशा शब्दांत यावेळी महापौर नितीन पाटील यांनी अभियानास शुभेच्छा दिल्या. पनवेल महानगरपालिकेचा आरोग्य विभाग विविध मोहिमांच्या यशस्वी व प्रभावी अंमलबजावणी साठी नेहमीच अग्रेसर असल्याचे प्रतिपादन करत निक्षय मित्र तसेच आशा वर्कर च्या कामाचे विशेष कौतुक यावेळी मान्यवरांनी केले. स्थायी समिती सभापती बबन मुकादम, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

**एआयचा प्रभावी वापर**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये या मोहिमेसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उच्च जोखीम वॉर्ड निश्चित करण्यात आले असून या अभियानामध्ये अतिजोखमीतील नागरिक तसेच उच्च जोखीम वॉर्डमधील १४ वर्षांवरील सर्व नागरिकांची तपासणी करण्यात येणार आहे. या अंतर्गत सुमारे १,२३,५५० नागरिकांची तपासणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यापैकी ५७,२७२ नागरिक उच्च जोखीम वॉर्डमधील आहेत.

**जनजागृती रॅलीचे आयोजन**

क्षयरोग विषयी जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले होते. क्षयरोगविषयक जनजागृती फलक तसेच घोषणा देत पनवेल मनपा कर्मचाऱ्यांनी रॅलीमध्ये उस्फुर्त सहभाग घेतला.

# नगरसेविका लीना म्हात्रेंच्या घराला आग; पैसे, दागिने, साहित्य जळाले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खुटारी येथील भाजपचे नंदकुमार म्हात्रे यांच्या जी प्लस टू इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील घराला रात्री २४ मार्च रोजी आग लागली. या आगीत घरातील दागिने, पैसे, आणि साहित्य जळून खाक झाले.



२४ मार्च रोजी रात्री दहाच्या सुमारास भाजपच्या नगरसेविका लीना म्हात्रे यांचे पती नंदकुमार म्हात्रे यांच्या घराला आग लागली. या आगीची माहिती अग्निशमन दलाला देण्यात आल्यानंतर सिडको अग्निशामक दलाने ही आग पूर्णपणे विझवली. यावेळी कपाटातील दागिने, पैसे आणि घरातील कपाट, एसी, बेड, सोफा आणि इतर साहित्य जळाले.

यावेळी दागिने, पैसे काढून म्हात्रे यांना देण्यात आले. किचनमधून सिलेंडरदेखील बाहेर काढण्यात आले. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवित हानी झाली नाही.

# कळंबोली पोलिसांचे ऑल आउट आणि कोंबिंग ऑपरेशन

**कळंबोली : बातमीदार**



पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०३ व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, खारघर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली कळंबोली पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात ऑल आउट व कोम्बींग ऑपरेशनचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग घेऊन कायदा सुव्यवस्था चोख राहण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या यावेळी नागरिकांचेही विशेष सहकार्य लाभले.

ऑल आउट आणि कोंबिक ऑपरेशन दरम्यान ऑपरेशन खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली व नमूद केल्या प्रमाणे गुन्हे नोंद करून कारवाई करण्यात आली आहे. NDPS ८(C), २७ प्रमाणे ०२ कारवाई करण्यात आल्या,भारतीय हत्यार कायदा ४/२५ प्रमाणे - ०१ कारवाई करून एक कोयता जप्त करण्यात आला, दारूबंदी अधिनियम प्रमाणे - ०२ कारवाई करण्यात आल्या,सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या रहदारीस अडथळा निर्माण करणे BNS. २८५/२८७ प्रमाणे - ०३ कारवाई करण्यात आल्या, गुटका व तंबाखू जन्य पदार्थ अनुषंगाने (COTPA) प्रमाणे – ०५ कारवाई करण्यात आली.

पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये ०१ ठिकाणी नाकाबंदी नेमण्यात आली होती,नाकाबंदी दरम्यान १८५ वाहने चेक केली आणि ३४ वाहनांवर M.V.Act प्रमाणे कारवाई व ३४०००/- रु दंड करण्यात आला आहे, मो वा का १८५- ०२, ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान एकूण ०५ (BW) वॉरंट बजावणी, ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान एकूण १० समन्सची बजावणी करण्यात आली, नमूद कोंबिंग ऑपरेशन दरम्यान १७ अभिलेखावरील आरोपी चेक केले असता एकूण ०५ अभिलेखावरील आरोपी मिळून आले, ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान ०३ लॉज चेकिंग करण्यात आले, ऑल आउट व कोंबिंग ऑपरेशन दरम्यान एकूण ०८ गुन्हे दाखल करण्यात आले.

# पोलिसांच्या तत्परतेमुळे विद्यार्थ्यांची परीक्षा वाचली

**पनवेल : वार्ताहर**



अमेठी इंजिनिअरिंग कॉलेज, भाताण येथे विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षांच्या पार्श्वभूमीवर एक मोठा वाहतूक अडथळा निर्माण झाला होता. अजिवली ते भाताण या मार्गावर एक कंटेनर ट्रेलर रस्त्याच्या मध्यभागी आडवा होऊन बंद पडल्याने संपूर्ण वाहतूक ठप्प झाली. यामुळे परीक्षेसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले.

घटनेची माहिती मिळताच नवीन पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश संकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संजय गावडे, ज्ञानेश्वर वाघ आणि जितेंद्र कदम यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी त्वरीत उपाययोजना सुरू केल्या.

पोलिसांनी जेसीबी मशीनच्या मदतीने रस्त्याच्या कडेला तात्पुरता कच्चा मार्ग तयार करून वाहतूक सुरू केली. तसेच स्थानिक रिक्षाचालकांना विनंती करून विद्यार्थ्यांना कॉलेजपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था केली. या प्रयत्नांमुळे अनेक विद्यार्थी वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचू शकले. यानंतर हायड्रा क्रेनच्या साहाय्याने बंद पडलेला ट्रेलर रस्त्याच्या बाजूला हलवण्यात आला आणि काही वेळातच वाहतूक पूर्णपणे सुरळीत करण्यात आली. या प्रसंगी अमेठी इंजिनिअरिंग कॉलेजचे व्यवस्थापक गुरु बक्ष सिंग यांनी नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनापासून आभार मानले. तसेच विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनीही वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश संकपाळ तसेच पोलीस हवालदार संजय गावडे, ज्ञानेश्वर वाघ आणि जितेंद्र कदम यांच्या कार्याचे विशेष कौतुक करत कृतज्ञता व्यक्त केली.

या घटनेमुळे पुन्हा एकदा पोलीस दलाची जबाबदारीची जाणीव आणि वेळेवर केलेली कार्यवाही किती महत्त्वाची असते, याचे उत्तम उदाहरण पाहायला मिळाले.

# पनवेलजवळ भीषण अपघात; वाहतूक पोलिसांमुळे जखमीचा जीव वाचला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या कोन फाटा ते रसायनी रोडवर इंडिया बुल्स सोसायटीजवळ मोटरसायकल आणि स्कुटी यांच्यात आज समोरासमोर भीषण अपघात झाला. या अपघातात महेंद्र रामनारायण यादव (रा. कळंबोली) हे गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मोटरसायकल (एमएच ४६ सीटी ८८५२) आणि स्कुटी (एमएच ०३ ईवाय ९१७१) यांच्यात अचानक समोरासमोर धडक झाल्याने अपघात घडला. अपघातानंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, त्या मार्गावर पेट्रोलिंग करत असलेल्या नवीन पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार संजय जाधव, संजय गावडे, तसेच पोलीस कॉन्स्टेबल चंदू सूर्यवंशी आणि दत्ता उबाळे



यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी कोणतीही वेळ न दवडता नवकार लॉजिस्टिक कंपनीची ॲम्बुलन्स बोलावून जखमी महेंद्र यादव यांना तातडीने कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

अपघातानंतर रस्त्यावर निर्माण झालेली वाहतूक कोंडी पोलिसांनी त्वरीत दूर करून वाहतूक सुरळीत केली. अपघातग्रस्त दोन्ही वाहने बाजूला काढून पुढील कारवाईसाठी पनवेल तालुका पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आली आहेत. या घटनेत वाहतूक पोलिसांनी दाखवलेल्या तत्परता आणि कर्तव्यदक्षतेमुळे जखमी व्यक्तीला वेळेत उपचार मिळू शकले. या कार्याबद्दल कोन गावचे सामाजिक कार्यकर्ते सुनील कोरडे यांनी वाहतूक पोलिसांचे मनापासून आभार व्यक्त केले आहेत. स्थानिक नागरिकांकडूनही पोलिसांच्या या तातडीच्या मदतीचे कौतुक केले जात असून, अशा प्रसंगी पोलिसांची तत्परता किती महत्त्वाची असते, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे.

# फुंडे विद्यालयाला स्मार्ट टिव्ही व बेंचेस प्रदान



**उरण : रामप्रहर वृत्त**

तुकाराम हरी वाजेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये ओएनजीसी व ओम इन्फोटेक मार्फत २६ स्मार्ट टीव्ही व २०० बेंचेस प्रदान व उद्घाटन समारंभ झाला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शिक्षण घेण्याची नवीन संधी उपलब्ध झाली आहे. स्मार्ट क्लास रूमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना डिजीटल पध्दतीने अध्यापन करण्यात येणार असून शिक्षण अधिक रंजक, समजण्यास सोपे आणि प्रभावी होणार आहे या उपक्रमा मुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना देखील शहराप्रमाणे आधुनिक शिक्षणाचा लाभ मिळणार आहे. प्राचार्य बी.बी. साळुंखे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

या वेळी उपस्थित मान्यवर एस.एन. अहमद, बी. एस. आठवले, शाम पाडेकर, ए.पी.पाटील, निलेश साळुंखे, सुमित शर्मा, रणजित गुप्ता यांना गौरविण्यात आले. बी. एस. आठवले यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवन कार्य सांगितले.

त्या नंतर एस. एन.अहमद यांनी शाळेमध्ये राबवीत असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमाचे कौतूक केले. स्मार्ट टिव्ही च्या माध्यमातून अध्ययन, अध्यापन प्रक्रियेसाठी चांगल्या प्रकारे फायदा होईल, असे प्रतिपादन केले.प्रत्येक वर्ग खोलीत इयत्ते नुसार स्मार्ट टीव्हीवर Kompikon चे सर्व विषयाचे स्टडी मटेरीयल अपलोड केलेले आहे. याचे प्रात्यक्षिक प्राध्यापिका पी.एस. ठाकूर यांनी केले विशेष सहकार्य उपशिक्षक पी.ए. पाटील व प्राध्यापक हृषीकेश धुरी यांचे लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सां.वि. प्रमुख एच. एन.पाटील व आभार विद्यालयाचे माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष भार्गव पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.



**पनवेल : शहरातील गार्डन हॉटेलसमोरील सिंगलजवळ बुधवारी सायंकाळी एका स्विफ्ट गाडीने अचानक पेट घेतला. यात गाडीचे मोठे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन दलाच्या सर्तकतेमुळे आग लगेच विझविण्यात आली.**



**पनवेल : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे प्रमुख कार्यवाह तसेच नाट्य परिषद नियामक मंडळ मध्यवर्ती, मुंबईचे सदस्य शामनाथ पुंडे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी पनवेल टाइम्सचे संपादक गणेश कोळी, ज्येष्ठ साहित्यिक, कोमसाप नवीन पनवेल शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.चंद्रकांत मढवी तसेच ॲड.मनोज म्हात्रे, कवी गणेश म्हात्रे, पत्रकार संजय कदम, संजय गोडसे, भालचंद्र जुमलेदार, समीर वेश्वीकर आदी उपस्थित होते.**

# चिरनेर येथील डोंगरावरील इंद्रायणी एकविरा देवीच्या यात्रेला गर्दी

**उरण : प्रतिनिधी**



चिरनेर - दिघाटी परिसरातील इंद्रायणी डोंगरावरील पांडवकालीन जागृत स्थान मानले जाणारी इंद्रायणी एकविरा देवीची यात्रा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. हि पांडवकालीन इंद्रायणी एकविरा देवी गुराख्यांची एकविरा देवी म्हणून प्रसिद्ध पावलेली आहे. आजही या देवीला गुराख्यांची देवी असे संबोधले जाते. चैत्र नववीच्या दिवशी उरण, पनवेल तालुक्यातील चिरनेर, दिघाटी, केळवणे, साई, कळंबुसरेसह पेण तालुक्यातीलही भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

देवी वसलेल्या स्थानाच्या डोंगरावरून पश्चिमकडे पाहिले असता अरबी समुद्र व मुंबईचे दर्शन होते. नवसाला पावणारी आगरी कोळ्यांचे आराध्य दैवत म्हणून इंद्रायणी एकविरा देवीला हिंदू समाजातील आगरी, कोळी आणि कराडी समाजात आदिशक्ती असे मानाचे स्थान आहे. या स्थानावर अश्विन शुद्ध प्रतिपदेला नवरात्र उत्सव व चैत्र पौर्णिमेला देवीची यात्रा व पालखी निघते. त्यामुळे यात्रेसाठी व पालखी साठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

## संपादकीय

# दिशादर्शक निर्णय

हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त अन्य धर्म मानणाऱ्या व्यक्तीला अनुसूचित जातीचा सदस्य मानले जाऊ शकत नाही. इतर कोणत्याही धर्मात प्रवेश केल्यास अनुसूचित जातीचे लाभ पूर्णपणे गमावले जातील असे स्पष्ट प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केले. ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या आंध्र प्रदेशातील एका व्यक्तीच्या संदर्भातील प्रकरणावर न्यायालयाने हा निर्वाळा दिला असला तरी तो त्या प्रकरणापुरता मर्यादित नाही. अनुसूचित जातीचा सदस्य म्हणून मिळणाऱ्या सवलती व संरक्षण धर्मांतरानंतरही कायम राहिले पाहिजे हा दावा चुकीचा असल्याचे या निर्णयामुळे स्पष्ट झाले आहे.

**हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त अन्य कोणत्याही धर्माचे पालन करणाऱ्या व्यक्तीला अनुसूचित जातीचा (एससी) सदस्य मानता येणार नाही असा स्पष्ट निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिला. धर्मांतरानंतर संबंधित व्यक्तीचा 'एससी'चा दर्जा रद्द होतो या आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या यापूर्वीच्या आदेशाचे सर्वोच्च न्यायालयाने समर्थन केले. गेली काही वर्षे सातत्याने यासंदर्भात उलटसुलट चर्चा व वाद सुरू होते. अनुसूचित जातींमधील एखाद्या व्यक्तीने धर्मांतर केले तरी त्या व्यक्तीची जात पुसली जात नाही व त्या अनुषंगाने मिळणारी भेदभावाची वा अवहेलनेची वागणूकही थांबत नाही. त्यामुळे संबंधित व्यक्तीला अनुसूचित जातीचा सदस्य म्हणून मिळणाऱ्या सवलती धर्मांतरानंतरही चालू ठेवायला हव्यात असे मत यापूर्वी अनेकदा मांडले गेले आहे. परंतु हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्म वगळता अन्य कोणताही धर्म स्वीकारणारी व्यक्ती 'अनुसूचित जाती' या सदरात मोडत नाही असे सर्वोच्च न्यायालयाने आता सुस्पष्टपणे म्हटले आहे. न्यायालयाने यासंदर्भात नमूद केले आहे की 'अनुसूचित जाती आदेश, १९५०'मध्ये याबाबत स्पष्ट तरतूद असून हा निर्बंध पूर्णपणे लागू होतो. या आदेशातील कलम तीन नुसार, नमूद केलेल्या धर्मांव्यतिरिक्त इतर कोणत्याही धर्मात धर्मांतर केल्यास, जरी त्या व्यक्तीचा जन्म अनुसूचित जातीमध्ये झाला असला तरी तिचा एससी दर्जा तात्काळ रद्द होतो. अशा व्यक्तीला संविधानाअंतर्गत अथवा संसद किंवा राज्य विधिमंडळाच्या कायद्यांनुसार मिळणारे कोणतेही संरक्षण, आरक्षण, हक्क किंवा वैधानिक लाभ मिळू शकत नाहीत. तसेच त्याविषयीचा दावाही ती व्यक्ती करू शकत नाही. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या यासंदर्भातील आदेशाला कायम ठेवत न्या. प्रशांतकुमार मिश्रा आणि एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. ख्रिस्ती धर्म स्वीकारून पाद्री म्हणून काम करणाऱ्या आंध्र प्रदेशातील एका व्यक्तीच्या संदर्भातील प्रकरणावर न्यायालयाने हा निर्वाळा दिला आहे. मारहाण करणाऱ्या काही व्यक्तींविरोधात संबंधित पाद्री व्यक्तीने अनुसूचित जातीजमाती अत्याचार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होतो. त्याला आरोपींनी बेकायदा ठरवून आव्हान दिले. अॅट्रॉसिटी कायदा या प्रकरणात लागू होत नसल्याचा दावा आरोपींनी केला. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयानेही ख्रिस्ती धर्मात जातिव्यवस्था नसल्याने अॅट्रॉसिटी कायद्याच्या तरतुदी लागू होत नसल्याचे सांगत तक्रारदाराने दाखल केलेले आरोप रद्द केले. आता सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात दिलेला निकाल ऐतिहासिक असून संविधानाच्या मूळ भावनेशी सुसंगत आहे. संबंधित तरतुदींचा गैरवापर रोखण्यास या निर्णयामुळे मदत होऊ शकेल. हिंदू समाजातील जातिव्यवस्थेमुळे काही लोकांवर अनेक वर्षे अन्याय झाला. मागास राहिलेल्या या समाजाच्या परिस्थितीचा फायदा उठवून धर्मांतरे केली जात असतील तर त्यास गैरच म्हणावे लागेल. अशा गैरप्रकारांनाही या निर्णयातून चाप बसू शकेल.**

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

पोलादपूर तालुक्यातील रोजगार हमी योजनेची कामे गेल्या काही महिन्यापासून कोटीकोटीची उड्डाणे घेऊन नावारूपाला आलेली ही रोहयोची विविध कामे आणि महाड विधानसभा मतदार संघाला महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचे मंत्री पद मिळाल्याने ही योजना आता सर्वशृत झाली आहे.

सन २००५ मध्ये केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (विद्यमान नाव –महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम) लागू केला. तदनुसार महाराष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये पूर्वीचा कायदा ठेवण्याचा पर्याय स्विकारला आहे. मात्र विधिमंडळाने केंद्रीय कायदयास अनुसरुन राज्यास निधी मिळण्याच्या अनुषंगाने १९७७ च्या कायदयात आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपध्दतीत बदल झाला आहे. या योजने अंतर्गत खालील दोन योजना सुरु आहेत. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगार नागरिकांना रोजगार प्रदान केला जातो. असे सर्व नागरिक जे शारीरिकदृष्टया श्रम करण्यास सक्षम आहेत, त्यांना या योजनेचा लाभ दिला जातो. वर्ष १९७७ मध्ये महाराष्ट्र सरकारद्वारे अकुशल कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देश्याने रोजगार अधिनियम लागू करण्यात आला. या अधिनियम अंतर्गत दोन योजनांचे संचालन केले जाते. त्यापैकी एक महाराष्ट्र रोजगार हमी योजना आहे.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा २००५**

सन २०२५ मध्ये केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (विद्यमान नाव –महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम) लागू केला. तदनुसार महाराष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये पूर्वीचा कायदा ठेवण्याचा पर्याय स्विकारला आहे. मात्र विधिमंडळाने केंद्रीय कायदयास अनुसरुन राज्यास निधी मिळण्याच्या अनुषंगाने १९७७ च्या कायदयात आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपध्दतीत बदल झाला आहे. सद्य:स्थितीत राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अंमलात आहे, व या योजने अंतर्गत दोन योजना सुरु आहेत. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगार नागरिकांना रोजगार प्रदान केला जातो. असे सर्व नागरिक जे शारीरिकदृष्टया श्रम करण्यास सक्षम आहेत, त्यांना या योजनेचा



लाभ दिला जातो. या योजनेच्या माध्यमातून एका वर्षात अकुशल कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला कमीत कमी १००दिवसांचा रोजगार प्रदान केला जातो.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

मग्रारोहयो मध्ये एकुण कामांच्या खर्चाच्या किमान ५० टक्के खर्चाची कामे ग्राम पंचायतीने करणे अपेक्षित आहे. याकरिता जिल्हयाला उपलब्ध होणाऱ्या एकुण निधी पैकी अनुज्ञेय ५० टक्के रक्कमेच्या ५० टक्के निधी ग्राम पंचायतीकडे तातडीने वर्ग करण्याबाबत सविस्तर आदेश दिनांक २ ऑगस्ट २००६ अन्वये देण्यात आले आहेत.

मग्रारोहयो अंतर्गत ज्या कुटुंबांची नावनोंदणी केली आहे. अशा सर्व कुटुंबांना फोटोसहित लॅमिनेट केलेले जॉबकार्ड देण्यात यावे. मग्रारोहयो अंतर्गत जी कामे अनुज्ञेय आहे त्याची सूची परिशिष्ट १ मध्ये दिलेली आहे. केंद्रिय कायद्याअंतर्गत ज्या वैयक्तिक लाभार्थींच्या योजनेचा समावेश करण्यात आलेला नाही, उदा. राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत फलोत्पादन, जवाहर विहीरी, तुती लागवड, इत्यादी या योजनेकरिता राज्य रोजगार हमी योजनमध्ये निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ मधील कलम ४ व २८ अन्वये राज्य शासनाने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना २००५या नावाने एक नवीन योजना तयार केलेली आहे. या योजने अंतर्गत दोन्ही (राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी व राज्य रोजगार हमी योजने) च्या विशिष्ट बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये समाविष्ट नसलेल्या वैयक्तिक लाभदायक योजनाचादेखिल समावेश आहे.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामे हाती घेताना,राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या २००६ वर अनुज्ञेय नसलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजनावरील खर्च राज्य रोजगार हमी योजनेच्या निधीतून करावा लागणार आहे.

महाराष्ट्र रोजगार हमी योजना २००५ सुरू झाल्यानंतर राज्यामध्ये निरनिराळ्या योजना खालील नावाने संबोधण्यात येणार आहे. राज्य रोहयो आणि र राष्ट्रीय रोहयो, महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम २००५ (यापुढे मग्रारोहयो) याप्रमाणे संबोधित करताना संभ्रम निर्माण होऊ नये म्हणून यास अनुक्रमे राज्य रोहयो, राष्ट्रीय रोहयो व मग्रारोहयो असे संबोधण्यात येणार आहे.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना चालु केल्यानंतर कामासाठी धान्य राष्ट्रीय कार्यक्रम व संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजना या योजनेत समाविष्ठ करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्रात ग्रामीण रोजगार हमी योजना गेली ३४ वर्षे चालू असल्याने सर्व कर्मचाऱ्यांना तिची कार्यपध्दती नियम आत्मसात झालेले आहेत. आता महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत या नियमावलीमध्ये काही नवीन बाबी अंतर्भुत असल्याने अधिकारी व कर्मचारी यांच्या मनामध्ययें संभ्रम निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबींचे निराकरण करण्यासाठी व ही अत्यंत महत्वाची योजना राज्यांमध्ये यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व बाबींचा सखोल अभ्यास करुन शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

कामाच्या ठिकाणी सुविधा– कामाच्या ठिकाणी पारदर्शकता असावी. काम सुरू करण्यापुर्वी मजूरांना कामाविषयीच्या माहिती सांगण्यात यावी. कामाचा मंजूरी आदेश, मोजमाप पुस्तिका बाबत तपशिल उपलब्ध, कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावण्यात यावा त्या गावाच्या पाच किलोमीटर अंतराच्या आत काम मजुरांना देण्यात यावे पाच किलोमीटर पेक्षा जास्त अंतर असल्यास मजुरीच्या १०टक्के रक्कम हि प्रवास भत्ता म्हणून अनुज्ञेय आहे. कामाच्या ठिकाणी, निवाऱ्याची व्यवस्था करावी जेणे करून दुपारच्या सुट्टीत विश्रांती जेवन करता येईल. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, पाच वर्षापेक्षा पाच पेक्षा जास्त मुले असतील तर सांभाळण्यासाठी दाईची नेमणुक करावी. अर्थात पाळणाघर, औषधी उपचार पेटी आणि महिलांसाठी लागणाऱ्या अत्यावश्यक किट ठेवण्यात येते.

समुदायासाठी मत्स्यपालनाचे तलाव बांधणे, मत्स्य पालन तलावांची दुरुस्ती व देखभाल,मत्स्यपालनाचे तलाव नूतनीकरण, वितरक कालवा बांधणे, सतत समोच्च खंदक खंदकाचे बांधकाम, लघु कालव्याचे बांधकाम, उप–गौण कालव्याचे बांधकाम,जल कोसे बांधणे, फीडर कालव्याची अस्तर, वितरक कालव्याचे अस्तर, लघु कालव्याचे अस्तर, उप–गौण कालव्याची अस्तर, कालवा कालव्याची अस्तर, फीडर कालव्याचे नूतनीकरण, वितरक कालव्याचे नूतनीकरण, किरकोळ कालव्याचे नूतनीकरण, फीडर कालव्याची दुरुस्ती व देखभाल, लघु कालव्याची दुरुस्ती व देखभाल, स्थिरीकरण तलावाचे बांधकाम, स्थिरीकरण तलावाची दुरुस्ती व देखभाल, बंधारा बांधणे, सिंचनाचे बांधकाम व्यक्तींसाठी खुले आहे, सिंचन बांधकाम समाजासाठी ओपन वेल, सिंचन ओपन वेलचे पॅरापेट व प्लॅटफॉर्मची दुरुस्ती व व्यक्तीसाठी सिल्विपंचर ग्रासस्लैंडचा विकास, सिल्व्हीपॅचर ग्रासस्लैंडचा विकास,समुदायासाठी पूर डायव्हर्शन चॅनेलचे नूतनीकरण, समुदायासाठी बर्कले कंपोस्ट खत, गटाकरिता बकले कंपोस्ट पिट बांधकाम, अन्न धान्य साठवण इमारतीचे बांधकाम, धान्य साठवण इमारतीची द्रुस्ती व देखभाल,गटांसाठी कृषी उत्पन्न साठवण इमारतीचे बांधकाम, समुदायासाठी शेतात रेशीम लागवड झाडाचे रोपण, व्यक्तीसाठी शेतात वृक्षारोपण वृक्षांचे रोपण,रेशीम वृक्षांची कचरा ब्लॉक लागवड,विखुरलेल्या रेषेच्या वृक्षारोपण व्यक्तीसाठी शेती वनीकरण वृक्ष,, सीमा रेषेसाठी वृक्षारोपण व वृक्षारोपण, किनारपट्टीवरील रेषेखालील वृक्षारोपण व वृक्षारोपण, व्यर्थभूमी व वृक्षारोपण वक्षारोपण व्यक्तीसाठी, व्यक्तीसाठी निवारा बेल्टच्या झाडाची लाइन लागवड, किनार्यावरील निवारा बेल्ट वृक्षांची लागवड लाइन, शेतात बागायती वृक्षांचे रोपण करणे, बागायती वृक्षांची कचरा ब्लॉक लागवड, शेतात शेती वनीकरण वृक्षांचे ब्लॉक वृक्षारोपण, व्यर्थभूमीत लोकांसाठी शेती वनीकरण वृक्षांची लागवड, कचराभूमी व्यक्तीसाठी रेशीम पिकांचे रोप लावतात, व्यर्थभूमीमध्ये वनीकरण वृक्षांचे रोपण, शेतात रेशीम लागवड झाडाचे रोपण, बायोगैरेनेज वृक्षांची कचराभूमी ब्लॉक लागवड, शेतात बायोड्रेनेज वृक्षांचे ब्लॉक वृक्षारोपण, निवारा बेल्ट वृक्षांचे ब्लॉक वृक्षारोपण, किनार्यावरील निवारा बेल्ट वृक्षांची सीमा ब्लॉक लागवड, बागायती वृक्षांची कालवा लाइन वृक्षारोपण, शेती वनीकरण वृक्षांची सीमा रेषेत वृक्षारोपण, असे अनेक व्यक्ती आणि समुदायासाठी विविध कामांची यादी योजनेतून करण्यासाठी जारी झाली आहे.



## बदलते तंत्रज्ञान



### फोन हरवल्यास डेटाचोरी होऊ शकतो; सुरक्षिततेसाठी हे करा...

आपल्याकडे अनेकांचे मोबाईल चोरीला जातात. आपल्याला मोबाईलपेक्षा आपल्याकडे असलेला डेटा चोरी होईल याची भीती जास्त असते. महत्त्वाचा डेटा चुकीच्या व्यक्तीच्या हाती जाऊ नये म्हणून लगेच पाऊल उचलावी लागतात. यासाठी काही सेटींग करून ठेवावी लागेल.



चोरी झालेला मोबाईल गुगल आणि अॅपलच्या ट्रॅकिंगने शोधता येऊ शकतो. अँड्रॉइड फोनसाठी तुमचा फोन ट्रॅक करण्यासाठी तुम्ही Find My Device वापरू शकता. यासाठी दुसऱ्या फोन किंवा कॉम्प्युटरवरून Google Find My Device वेबसाइट उघडा. हरवलेल्या फोनमध्ये असलेल्या तुमच्या गुगल अकाउंटने लॉगिन करा. जर फोन चालू असेल आणि इंटरनेटशी कनेक्ट केलेला असेल तर तुम्हाला फोनचे ठिकाण दिसेल.

आयफोनसाठी दुसऱ्या डिव्हाइसवर iCloud ओपन करा. नंतर तुमच्या Apple आयडीने लॉगिन करा. याच्या मदतीने तुम्ही डिव्हाइसचे ठिकाण पाहू शकता. अॅपलमध्ये लास्ट नोन लोकेशन फिचर असते.

जर फोन ट्रॅक झाला असेल तर तो ताबडतोब लॉक करा आणि स्क्रीनवर मेसेज टाका. अँड्रॉइडसाठी Find My Deviceवर जा आणि Secure Device पर्याय निवडा आणि फोन लॉक करा. नंतर स्क्रीनवर एक कस्टम मेसेज (उदा. हा फोन हरवला आहे, कृपया या XXXX नंबरवर कॉल करा) दिसण्यासाठी पर्याय निवडा. आयफोन असेल तर iCloudवर जा आणि लास्ट मोड ऑन करा. एक फोन नंबर आणि मेसेज पाठवा. हा मेसेज स्क्रिनवर दिसणार आहे.

तुमच्या नेटवर्क प्रोव्हायडरला संपर्क करा आणि सिम कार्ड ब्लॉक करा. एअरटेलचे सिम कार्ड असेल तर १२१ वर जा. जिओचे सिम कार्ड असेल तर १९९वर कॉल करा. जर वोडाफोन–आयडियाचे असेल तर १९९वर कॉल करा.

अॅप्स आणि ऑनलाईन सेवांना सुरक्षित ठेवण्यासाठी पासवर्ड बदला. गुगल अकाऊंट सिक्युरिटीजवर जाऊन पासवर्ड बदला तसेच फेसबुक आणि इन्स्टाग्रामचे पासवर्ड बदलण्यासाठी वेबसाईटवर जा. नेट बँकिंगचा पासवर्ड बदलण्यासाठी बँकेच्या वेबसाईटवर जावे लागेल.

# प्रसिद्धी पराङ्मुख कवी व गीतकार ग्रेस

तीगेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता... या काव्याने घरोघरी पोहचलेले माणिक गोडघाटे ऊर्फ कवी ग्रेस हे मराठी कवितेच्या प्रांतावर मौलिक ठसा उमटवून गेले.

कवी ग्रेस यांची मर्ढेकरोत्तर नव कवींच्या दुसऱ्या पिढीतील प्रमुख कवींमध्ये गणना होते. ग्रेस मूळचे नागपूरचे. त्यांचा जन्म १० मे १९४०चा. त्यांचे वडील सैन्यात होते. नागपुरातील कर्नल बाग परिसरात त्यांचे बालपण हलाखीच्या परिस्थितीत गेले. आईच्या अकाली निधनामुळे नोकरी व शिक्षण यांच्यात मेळ साधत त्यांना आपली प्रतिभा जपावी लागली. १९६६मध्ये ते नागपूर विद्यापीठातून मराठीमध्ये एमए झाले. त्यानंतर दोन वर्षं त्यांनी धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये अधिव्याख्याता म्हणून नोकरी केली. १९६८पासून १९९७ साली निवृत्त होईपर्यंत ते नागपूरमधील वसंतराव नाईक समाजविज्ञान संस्थेत (मॉरिस कॉलेज) मराठीचे प्राध्यापक होते. निवृत्तीनंतर काही काळ ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या मराठी विभागात सौंदर्यशास्त्र या विषयाचे अध्यापनही करीत होते. ग्रेस यांच्या लिखाणाला सुरुवात झाली १९५५ सालापासून. 'छंद', 'सत्यकथा' या नियतकालिकांमधून त्यांच्या कविता



**निमित्त**

सुरुवातीला प्रसिद्ध झाल्या. १९६७ साली त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'संध्याकाळच्या कविता' प्रसिद्ध झाला. त्यांचे समकालीन कवितेत असलेले वेगळेपण या कविता संग्रहामुळे अधोरेखित झाले. मुक्तछंदाचा प्रभाव असणाऱ्या या काळात ग्रेस यांनी निष्ठेने वृत्तबद्ध आणि नादानुसारी लयविभोर काव्यरचना केली. त्यामुळे त्यांची कविता सौंदर्यवादी असूनही तिला अभिजाततेची वैशिष्ट्यं प्राप्त झाली. यानंतर प्रसिद्ध झालेल्या राजपुत्र आणि डार्लिंग (१९७४), चंद्रमाधवीचे प्रदेश (१९७७), सांध्यपर्वातील वैष्णवी, सांजभयाच्या साजणी आदी संग्रहांमधून त्यांची कविता अधिक गूढ आणि व्यामिश्र होत गेलेली जाणवते. ग्रेस हे विलक्षण आत्ममग्न कवी होते. ग्रेस एक बेट आहे आणि या बेटाला समजून घेण्यासाठी त्या बेटावरच यावे लागते असे ग्रेस वारंवार म्हणायचे. ग्रेस यांचे मराठीसोबत इंग्रजी व उर्दू भाषांवर प्रभुत्व होते. त्यांच्या कवितांमधून याचा प्रत्यय येतोच, पण त्यांच्या व्याख्यानांमधे व पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्यासोबत त्यांनी केलेल्या कार्यक्रमांमधूनही त्यांच्या प्रखर वाणीचा अनुभव रसिकांना येत असे. ग्रेस यांच्या काव्याइतकीच मोहिनी त्यांच्या ललित लेखनानेही वाचकांच्या मनावर घातली आहे. 'चर्चबेल' हा त्यांचा पहिला ललित लेख संग्रह १९७४मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर 'मितवा', 'संध्यामग्न पुरुषाची लक्षणे', 'मृगजळाचे बांधकाम', 'वाऱ्याने हलते रान', 'ओल्या वेळूची बासरी' हे त्यांचे ललित लेख संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. माणिक गोडघाटे यांनी कवी म्हणून 'ग्रेस' हे नाव धारण करण्यामागे कारण ठरली ती लोकप्रिय पाश्चात्त्य अभिनेत्री इन्ग्रीड बर्गमन. द इन ऑफ द सिक्स्थ हॅपिनेस' या चित्रपटात इन्ग्रीडसंबंधी 'शी इज इन ग्रेस' असं वाक्य उच्चारलं जातं. हे वाक्य ऐकल्यानंतर आपल्या आत्म्यावरची धूळ उडाली आणि आपल्याला प्रतिभेचा पहिला साक्षात्कार झाला, असे ग्रेस यांनी म्हटले आहे. ग्रेस यांचे २६ मार्च २०१२ रोजी निधन झाले. (साभार : बाईट्स ऑफ इंडिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### त्वचेचे आरोग्य जपणेही अतिशय महत्त्वाचे!

सौंदर्य टिकवून ठेवायचे असेल तर सातत्य राखणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामध्ये विविध ट्रीटमेंट असोत, सनस्क्रीन आणि मॉइश्चरायझर असो, यांच्या बरोबरीने निरोगी राहण्यासाठी योग्य आहार आणि विहार अतिशय महत्त्वाचे आहेत.प्रत्येक रुग्ण डॉक्टरांना पथ्य–पाण्याबद्दल विचारतो.



एक गोष्ट लक्षात ठेवा विशिष्ट पदार्थ भरपूर प्रमाणात खाल्ल्याने आपण लगेच तरुण दिसू शकत नाही, परंतु या पदार्थांचे नियमित सेवन वार्धक्यातदेखील छान दिसण्यात व छान वाटण्यात मदत करते.

ग्रीन टी, तेलकट मासे, डार्क चॉकलेट, विविध भाज्या, आळशीच्या बिया, सर्व प्रकारची फळे विशेषतः डाळिंब, केळी आणि लिंबूवर्गीय फळे, व्होकॅडो, ऑलिव्ह ऑइल हे काही महत्त्वाचे अन्नघटक आहेत.ग्रीन टीचे काही अधिक फायदे आहेत. तो स्ट्रॉंग अँटीऑक्सिडंट आहे. ग्रीन टी रक्त पातळ करते, जे आपल्या हृदयासाठी फायदेशीर आहे, परंतु छोट्याशा शस्त्रक्रियेतसुद्धा जास्त रक्तस्त्राव करू शकते.

रावस, सुरमई आणि बांगडा यासारख्या तेलकट माशांमध्ये ओमेगा थ्री फॅटी सिड भरपूर प्रमाणात असतात. हे सिड त्वचेवरील तेलकट आवरण टिकवून ठेवते, ज्यायोगे त्वचा मुलायम राहते आणि सुरकुत्या कमी प्रमाणात तयार होतात. त्वचा शुष्क न झाल्यामुळे त्याच्यावर बारीक चिरा पडत नाहीत व अॅलर्जीचे प्रमाण आटोक्यात राहते. या माशांमधून प्रथिनांचा पुरवठा भरपूर होतो, ज्याच्या उपयोगाने त्वचेमध्ये कोलॅजेन आणि इलास्टिन या तंतूंची नवनिर्मिती होत राहते. हे दोन तंतू त्वचेला नितळ, लवचिक. मुलायम व गुबगुबीत करतात. माशांमध्ये सेलेनियम हे मूलद्रव्य भरपूर प्रमाणात असते. हे द्रव्य डीएनएच्या निर्मितीला आवश्यक असते, ज्यामुळे त्वचा पेशींना होणारी इजा रोखून नवीन पेशी निर्माण होतात.

सर्व प्रकारच्या भाज्यांमध्ये वेगवेगळी अँटीऑक्सिडेंटअसतात.शिवाय त्यातील तंतूमय पदार्थमोट्याआतड्यातील लॅक्टोबॅसिलाय या चांगल्या जीवाणूंच्या वाढीला मदत करतात. हे जीवाणू त्वचेचे आरोग्य राखण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. संत्री, मोसंबी, लिंबे आणि पेरू ही फळे म्हणजे क जीवनसत्वाची कोठारेच आहेत. त्यांच्यामुळे अतिनील किरणांचा दुष्परिणाम रोखण्याबरोबरच

त्वचेवरील पिगमेंटेशन कमी होण्यास मदत होते. उपोगाने वचेमे कोलजेन आणि इलाटिना ततूची नवनिमिती होत राहते.वचेवरील पिगमेंटेशन कमी होण्यास मदत होते.

# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल, जि. रायगड. पनवेल ४१०२०६

## मालमत्ता कर विभाग

### पनवेल महानगरपालिका हद्दीतील अनिवासी मालमत्ता थकबाकी धारकांची यादी दिनांक २५ मार्च २०२६ अखेर.

| अ. क्र. | मालमत्ता क्रमांक | करधारकाचे नाव | पत्ता | एकूण शिल्लक मागणी रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | KH2-19-230 | धारक - ग्लोमॅक्स मॉल | टी-२२, ग्लोमॅक्स मॉल, प्लॉट क्र., सेक्टर क्र.२, खारघर नोड, पनवेल | ९३,७३,४३३ |
| २ | KH12-882- | धारक - हरबंस सिंग कोहली | ईके ओंकार हेल्थकेअर सेंटर, प्लॉट क्र. एफ-३, सेक्टर क्र.१२, खारघर, पनवेल ४१०२१० | ८६,७४,१८१ |
| ३ | KL23-152- | धारक - सुधाकर शिखरे | प्लॉट क्र.१९३, १९४, सेक्टर क्र.२३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | ८२,७०,६३८ |
| ४ | TPRHG-1366- | कामरान इमरान शेख | अडाणी विलमार, एलटीडी कमरण वेअर हाऊसजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ८२,३६,८६६ |
| ५ | TPDNG1-420- | धारक - सायरस खुदाबक्ष इराणी | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ७७,१७,२५१ |
| ६ | TPDNG-592-1 | धारक - सुदाम पोशा पाटील | धानसर-तळोजा नोड, पनवेल | ६६,५५,५७३ |
| ७ | KH20-154-1 | धारक - प्रमोद नाथराम चौधरी व कन्या प्रमोद चौधरी | १, एम्पायर इस्टेट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, प्लॉट क्र.४२, ४१, सेक्टर क्र.२०, खारघर नोड, पनवेल | ६६,२९,६८८ |
| ८ | TPDNG1-204- | धारक - मोहमद सुखीयांत खान | रायन वेअर हाऊसजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ६५,९०,१९८ |
| ९ | KL23-30- | धारक - जे. बी. मार्बल्स ॲण्ड कंपनी | प्लॉट क्र.३४,३५,३६, सेक्टर क्र.२३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | ६५,५९,२७१ |
| १० | TPDNG-593-1 | धारक - सावित्री सुदाम पाटील | धानसर-तळोजा नोड, पनवेल | ६१,१६,२३९ |
| ११ | TPRHG-2178- | हरिष पोशा पाटील | विंग क्र., फॅक्टरी हाऊसजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ५८,११,६३७ |
| १२ | TPRHG-1395- | राम नारायण पाटील फोर स्टार वेअर ॲण्ड लॉजीस्टीक | मानेश ट्रान्सपोर्ट डिपार्टमेंटजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ५८,०९,८१४ |
| १३ | NPW6-25- | इतर धारक - गोविंदराव काशिनाथजी गावंड माध्यमिक विद्यालय | प्लॉट क्र.१२ए, १२बी, सेक्टर क्र. ६, नविन पनवेल पश्चिम ४१०२०६ | ५६,५६,०११ |
| १४ | TPDNG1-418-2 | सायरस खुदाबक्ष इराणी | फ्लॅट/गाळा क्र.२, किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ५३,४५,१२८ |
| १५ | TPDNG1-202- | धारक - मोहम्मद्द सुखीयांत खान | क्रिस्टल इंजीनीरिंगजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ४८,७०,१५४ |
| १६ | TPDNG1-417- | सायरस खुदाबक्ष इराणी | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ४८,५९,४०६ |
| १७ | TPRHG-1396- | धारक - असदाशिव रामचंद्र पाटील | विंग क्र., कंट्री डेलिघ्त वेयरहाऊस, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ४६,८५,३६८ |
| १८ | TPDNG-538-2 | धारक - बिलाल खान | धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ४४,२९,२८५ |
| १९ | KH2-19-70 | धारक - ग्लोमॅक्स मॉल | जी-६९, ग्लोमॅक्स मॉल, प्लॉट क्र., सेक्टर क्र. २, खारघर नोड, पनवेल | ४२,३३,७३४ |
| २० | KH19-11-34 | धारक - पुष्पा आचार्य | ३४, देवदर्शन कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र.२३,२४, सेक्टर क्र. १९, खारघर नोड, पनवेल | ४०,५०,४०८ |
| २१ | KL23-5- | धारक - किरण पारेख | प्लॉट क्र. ४, सेक्टर क्र.२३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | ३९,९४,८५९ |
| २२ | TPDNG1-437- | झुबेर शेहरुल्ला खान | किरवली टोल प्लाझा जवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३९,४४,५३७ |
| २३ | TPDNG1-456- | अब्दुल कडुस निवासी अलीखान शेरुनिसा कइस खान | किरवली टोल प्लाझा जवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३९,३९,२९३ |
| २४ | KH2-19-148 | धारक - ग्लोमॅक्स मॉल | एस-८, ग्लोमॅक्समॉल, प्लॉट क्र., सेक्टर क्र. २, खारघर नोड, पनवेल | ३९,०४,४५५ |
| २५ | TPRHG-1961- | अजय चंदलाल शाह | फ्हालकण फायबर जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३८,१३,८९९ |
| २६ | TPDNG1-419-2 | धारक - सायरस खुदाबक्ष इराणी | फ्लॅट/गाळा क्र.२, किरवली टोल प्लाझा जवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३६,९३,८६८ |
| २७ | KH2-19-140 | धारक - ग्लोमॅक्स मॉल | एफ-६८, ग्लोमॅक्समॉल, प्लॉट क्र., सेक्टर क्र.२, खारघर नोड, पनवेल | ३६,७७,४७१ |
| २८ | TPRHG-657- | धारक - सुर्यकांत हसुराम म्हात्रे | नियर सुवर्णा इंजीनीरिंग जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३४,७१,०१६ |
| २९ | TPDNG1-209- | धारक - गुलाम सय्यद शेख | धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३४,६७,७८१ |
| ३० | KL23-50- | धारक - शंकर सुधाकर शिंगारे, मे. एस.एस. मार्बल्सतर्फे प्रोप्रा. सुधाकर तुकाराम शिंगारे | श्री शिव इंटरप्राईजेस, प्लॉट क्र. ६१, ६२, सेक्टर क्र.२३, कळंबोली, रोडपाली नोड, पनवेल | ३४,५१,४५१ |
| ३१ | TPPPG-328- | कुशेद्र बेंडू म्हात्रे, रंजना कुसेन्द्र म्हात्रे | पापडीचा पाडा, तळोजा नोड, पनवेल | ३३,३८,४६७ |
| ३२ | TPRHG-655- | धारक - रविकांत म्हात्रे | नियर सुवर्णा इंजीनीरिंग जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३१,९९,४४४ |
| ३३ | TPRHG-1947- | परवेज वली मोहम्मद | फ्हालकण फायबर जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३०,३१,७२९ |
| ३४ | TPRHG-1381- | केशरबेन तनवीर गड्डा | एसकुरीस कोररुगातसन जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३०,१०,५२७ |
| ३५ | NPW16-1-30 | धारक - कर्नाळा स्पोर्टस् अकॅडमी | कर्नाळा स्पोर्टस् अकॅडमी, प्लॉट नं. ७, सेक्टर - १६, नविन पनवेल (पश्चिम), ता. पनवेल | २९,७४,१६० |
| ३६ | TPRHG-683- | धारक - कौशेंद्र म्हात्रे | आशीर्वाद प्रथणा सेंटरजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २९,२३,३९० |
| ३७ | KL23-27- | धारक - प्रेमलता पारीक | प्लॉट क्र. ३०, ३१, सेक्टर क्र. २३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | २७,९७,०९२ |
| ३८ | TPRHG-1397- | धारक - सुभाष पाटील | कंट्री डेलिघ्त वेयरहाऊस जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २७,८६,४६३ |
| ३९ | TPDNG1-206-1 | धारक - अल-हाज मोहम्मद युनूस खान S/O मोहम्मद झाकीर खान | मुफ्ती स्टील कंपनीजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २७,८२,३४९ |
| ४० | TPDNG-525-2 | धारक - संतोष महादू वाघ | फ्लॅट/गाळा क्र.२, धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २७,६४,९०० |
| ४१ | TPRHG-2169- | धारक - मोहम्मद इलीहास मोहम्मद इस्माईल खान | उक एंटरप्राइजेसजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २७,४०,०४४ |
| ४२ | TPRHG-677- | धारक - कोशेन्द्र म्हात्रे (सलवेश हाऊस) | आशीर्वाद प्रथणा सेंटर जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २६,९१,४०० |
| ४३ | TPRHG-1705- | अदनान अब्दुल गफुर सय्यद | मुंगाशेठ कंपाउंडजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २६,७६,०१५ |
| ४४ | TPDNG1-454- | धारक - संजीव अनंतराव करनाली | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २६,४२,४९२ |
| ४५ | TPDNG1-455- | धारक - संजीव अनंतराव करणाली | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २६,४२,४९२ |
| ४६ | TPRHG-1388- | सुनील लडकू पाटील, शरद लडकू पाटील | इ के सामनानी ॲण्ड को, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २५,९९,७०५ |
| ४७ | TPDNG-520-1 | धारक - मुबारक खान | फ्लॅट/गाळा क्र. १, धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २५,९१,५६९ |
| ४८ | KL23-99- | धारक - नारायण रावरिया | प्लॉट क्र. ११८, सेक्टर क्र. २३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | २५,७१,१०४ |
| ४९ | TPRHG-669- | धारक - संदीप म्हात्रे | क्रिएटिव पाऊडर कोटींगजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २४,९१,७५१ |
| ५० | TPDNG1-434- | धारक - अब्दुल कुददुस निवास अली खान, सेहरुनिसा अब्दुल कुददुस खान | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २४,७२,६११ |
| ५१ | TPDNG-523- | धारक - वकील अहमद जलील अहमद शाह व सिराज अब्दुल रऊफ शाह | धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २४,३६,८१४ |
| ५२ | NPE1S-89- | धारक - मे. शिल्पा बेवरेज प्रा.लि. तर्फे डायरेक्टर मिथीलेश डी. राजपूत | प्लॉट क्र. ८९, सेक्टर क्र. १एस, नविन पनवेल (पूर्व) ४१०२०६ | २३,७१,०४३ |
| ५३ | KL13-97- | धारक - सुदर्शन विला | प्लॉट क्र. ६०, सेक्टर क्र. १३,कळंबोली ,पनवेल. ४१०२१८ | २३,२७,३९२ |
| ५४ | TPRHG-2164- | मोहम्मद शहजादा खान, मोहम्मद युसुफ खान | इंडियन एंटरप्राइजसजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २३,१८,८३५ |
| ५५ | TPDNG-537-2 | धारक - शेख माजिद | फ्लॅट/गाळा क्र. २, धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २२,९९,८२२ |
| ५६ | TPDNG-522- | धारक - मोहम्मद अमीन दुखी शाह | धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २२,९८,०३४ |
| ५७ | TPRHG-451- | धारक - बाळाराम आबा पाटील | गज़बो ढाबा ॲण्ड फैमिली रेस्टोरेंट, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २२,३१,५५५ |
| ५८ | KLS1-22-13 | धारक - हाजी अब्दूल वहाब खान | प्लॉट क्र. ८५६, कळंबोली स्टील मार्केट यार्ड, पनवेल ४१०२१८ | २२,३१,०९० |
| ५९ | TPRHG-573- | धारक - स्वाती शरद म्हात्रे | फ्लामिंग इंडस्ट्रीस एलएलपीजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २२,०८,९३५ |
| ६० | KL23-49- | धारक - शंकर सुधाकर शिंगारे व में एस. एस. मार्बलतर्फे प्रोप्रा सुधाकर तुकाराम शिंगारे | आशापुरा मार्बल, प्लॉट क्र. ६०, सेक्टर क्र.२३, कळंबोली, रोडपाली नोड, पनवेल | २२,०४,१२१ |
| ६१ | NPW17A-3- | धारक - विजय हनुमंत आंग्रे | टाटा स्काय औठोरीतीस सर्विस प्रोवायडर ॲड डीलर, मोठा खांदा, नविन पनवेल (पश्चिम), पनवेल ४१०२०६ | २१,८७,१५० |
| ६२ | TPRHG-533- | किशोर चंद्रकांत म्हात्रे | क्रियांस रेसिडेन्सी, प्लॉट क्र., सेक्टर क्र. आरएचजी तळोजा, तळोजा पाचनंद, नावडे, पनवेल ४१०२०८ | २१,८५,९१९ |
| ६३ | KH2-19-214 | धारक - ग्लोमॅक्स मॉल | टी-६ ग्लोमॅक्समॉल, प्लॉट क्र., सेक्टर क्र. २, खारघर नोड, पनवेल | २१,५४,३३३ |
| ६४ | KH13A-248- | गजानन सुदाम पाटील, जयश्री चॅरिटेबल ट्रस्टचे ग्लोबल इंटरनॅशनल स्कुलतर्फे संचालक श्री. सुरज नरेश म्हात्रे | खारघर, खारघर नोड, पनवेल | २१,२५,८२० |
| ६५ | KM23-212- | धारक - दुर्गा विश्वास पावनेकर व रेश्मा पंडित पावणेकर | नौपाडागाव, कामोठे, पनवेल ४१०२०९ | २१,२१,१३५ |
| ६६ | TPRHG-1394- | नारायण प्रसाद मालवणी, एच प एम फमिली ट्रस्ट | अगस् ग्रीनबिल्ड लप, लाइट वेट एक ब्लॉक मॅन्युफॅक्चरिंग यूनिटजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २१,०२,९५९ |
| ६७ | KM23-248- | धारक - विठोबा गणपत म्हात्रे | नौपाडागाव, कामोठे, पनवेल ४१०२०९ | २०,८१,७२८ |
| ६८ | TPRHG-1258- | वशी अहमद जब्बार शेख | फ्लॅट/गाळा क्र. ४१/२, अंबे माता मंदिराजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २०,४८,३०५ |
| ६९ | TPDNG-504- | धारक - संतोष महादेव वाघ | धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २०,३६,७७३ |
| ७० | NPE8-12-19 | धारक - मेसर्स निल डेव्हलपर्स | ऑफीस-२, डॉक्टर हाऊस, प्लॉट क्र. १०५,१०६, सेक्टर क्र.८, नविन पनवेल (पूर्व), मोठा खांदा, खांदा कॉलनी, आसूडगाव नोड, पनवेल | १९,८७,६११ |
| ७१ | NPE8-12-20 | धारक - नंदकुमार शंकर गायकवाड | ऑफीस-४, डॉक्टर हाऊस, प्लॉट क्र. १०५,१०६, सेक्टर क्र.८, नविन पनवेल (पूर्व), मोठा खांदा, खांदा कॉलनी, आसूडगाव नोड, पनवेल | १९,२६,१५३ |
| ७२ | TPRHG-552- | शेर अली नजर अली खान | फडॉम्स केबिन्सरोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १९,२५,४९४ |
| ७३ | TPDNG1-453- | धारक - राजू बच्चन लालशेट्टी, खैर टेक्निकल सोसायटी | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १९,०८,१७४ |
| ७४ | TPDNG1-438- | आसिफ शेहरुल्ला खान | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १९,०४,५३६ |
| ७५ | TPRHG-1807-2 | मोहम्मद अरशद महिबुल्लाह खान, नजरे आलम शेख | इकरा प्रोटब्ले सिस्टम पीव्हीटी, एलटीडीजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १८,७६,०६९ |
| ७६ | TPRHG-453- | धारक - अरबाज अन्सारी | लकी तिंबर मार्ट, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १८,६९,९०७ |
| ७७ | KH20-96- | इतर धारक - पप्पू चौरसिया | प्लॉट क्र. ९५, सेक्टर क्र. २०, खारघर, पनवेल ४१०२१० | १८,३८,९९० |
| ७८ | TPRHG-2182- | हरिष पोशा पाटील | रोहिंजन गाव, तळोजा नोड, पनवेल | १८,३४,०३७ |
| ७९ | TPRHG-21- | असोसिएट रोड करिअर लि., रोहिंजण | आर्क ट्रान्सपोर्ट रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १८,००,४६५ |
| ८० | TPPPG-327- | कुशेद्रबेंडू म्हात्रे, सत्यम कुसेन्द्र म्हात्रे | पापडीचा पाडा, तळोजा नोड, पनवेल | १७,८६,२१८ |
| ८१ | KH2-21-24 | धारक - जयराम चावला, दीपा चावला | फ्लॅट/गाळा क्र. १०६, लिटिल वर्ल्ड मॉल, प्लॉट क्र. २१, सेक्टर क्र.२, खारघर, पनवेल ४१०२१० | १७,६९,५३४ |
| ८२ | TPDNG1-477- | मोइरफान अली मोजरिवाला | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १७,६९,४९० |
| ८३ | TPRHG-1846- | भरत कृष्ण भोईर, दिनेश वनवीर गड्डा | इंनलईने शिपिंग वेअरहाऊसजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १७,५७,८२८ |
| ८४ | KL23-3- | धारक - जतेंद्र रमेश झुनका | प्लॉट क्र.१,२, सेक्टर क्र.२३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | १७,४५,४४१ |
| ८५ | NPW8-17- | धारक - के चंद्रशेखर | प्लॉट क्र. ३५, सेक्टर क्र. ८, नविन पनवेल पश्चिम ४१०२०६ | १७,४३,९६७ |
| ८६ | KH35E-5-3 | धारक - प्रोव्हिसो कॉम्प्लेक्स | ३, प्रोव्हिसो कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र. ५,६,७, सेक्टर क्र. ३५ई, खारघर नोड, पनवेल | १७,३२,०१८ |
| ८७ | KH2-21-74 | धारक-गायत्री होम्स | लिटिल वर्ल्ड मॉल, प्लॉट क्र.२१, सेक्टर क्र.२, खारघर, पनवेल ४१०२१० | १७,२७,४३५ |
| ८८ | TPRHG-559- | धारक - मुरलीधर श्रीपत म्हात्रे | अल बुऱ्हानी क्रियेशन, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १७,१७,४२७ |
| ८९ | TPRHG-974- | मोहमद अरिफ खान २ मोहम्मद आसिफ खान | रेगेंत पार्कजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १७,०९,७८८ |
| ९० | KL23-100- | धारक - जयेश सर | प्लॉट क्र.११९, १२०, सेक्टर क्र. २३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | १७,०७,९३३ |
| ९१ | KH2-21-19 | धारक - हिरालाल एन. बालोटिया | फ्लॅट/गाळा क्र. १०१, लिटिल वर्ल्ड मॉल, प्लॉट क्र.२१, सेक्टर क्र.२, खारघर, पनवेल ४१०२१० | १०,१३,६११ |
| ९२ | KM23-225- | धारक - राजेश काळूराम भगत | नौपाडागाव, कामोठे, पनवेल ४१०२०९ | ९,८९,४६६ |
| ९३ | KH12-233- | धारक - शिवकुमार शेरखाने | प्लॉट क्र. बी-५३, सेक्टर क्र. १२, खारघर, पनवेल ४१०२१० | ९,६९,३४६ |
| ९४ | KM10-4-14 | फार्मा (इंडिया) तर्फे भागीदार गणपत रामलखन गुप्ता, सुंदरम फार्मा प्रायव्हेट लिमिटेड तर्फे अधिकृत सही करणार ब्रिजेश अमर बहादुरसिंह | सी-सीएमएच पहिला मजला, सह्याद्रि कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र.१२, सेक्टर क्र.१० कामोठे नोड, पनवेल | ९,६७,२७१ |
| ९५ | KH12-707- | धारक - प्रथा सरकार | प्लॉट क्र. ए-२१, सेक्टर क्र. १२, खारघर, पनवेल ४१०२१० | ९,५०,२२७ |
| ९६ | KH3-3-37 | धारक - डकारे | ३७,एस. एन. पार्क अपार्टमेंट, प्लॉट क्र., सेक्टर क्र. ३ खारघर नोड, पनवेल | ९,४५,४२६ |
| ९७ | KH12-1216- | धारक - संगीता आर रजनी | प्लॉट क्र. जी/७५, जी/७६, सेक्टर क्र. १२, खारघर, पनवेल ४१०२१० | ९,२३,४९८ |
| ९८ | KH13-107-253 | धारक - राजेश ओसवाल | गाळा नं.- एफ ११२, हावरे टीआर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., प्लॉट क्र. १८४, सेक्टर क्र. १३ खारघर नोड, पनवेल | ९,१८,९२२ |
| ९९ | KL23-20- | धारक - राजेश साबू | प्लॉट क्र. २२, सेक्टर क्र. २३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | ९,१२,६५९ |
| १०० | NPE1S-52- | धारक - धनवनसिंग गांधी | प्लॉट नं. ५२, सेक्टर क्र. १एस, नवीन पनवेल (पूर्व) ४१०२०६ | ९,११,११५ |

दिनांक २५/०३/२०२५ रोजच्या स्थितीपर्यंत याद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या औद्योगिक व व्यावसायिक मालमत्ता धारकांनी थकबाकीसह कर व इतर दंड, सदर जाहीर सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ५ (पाच) दिवसांच्या आत भरणे आवश्यक आहे. जे थकबाकीदार विहित मुदतीत मालमत्ता कराचा भरणा करणार नाहीत, त्यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कराधान नियम ४२ ते ४७ अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तसेच, नोटीस फी, वॉरंट फी, पेपर नोटीस फी इत्यादी शुल्क थकित मालमत्ता धारकांच्या बिलामध्ये समाविष्ट करून वसूल करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. तरी त्वरित मालमत्ता कराचा भरणा करून पनवेल महानगरपालिकेस सहकार्य करावे. मालमत्ता कर भरलेला असल्यास, त्याची पावती मालमत्ता कर विभाग/प्रभाग कार्यालयात सादर करावी.

**सही/-**
**उपायुक्त (कर)**
**पनवेल महानगरपालिका**



# ऐरोली येथे साखळी चोरट्यांचा हैदोस

## चाकूचे वार करून सोन्याच्या चेन पळवली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील ऐरोली येथे सोनसाखळी चोराने साखळी चोरताना महिलेने प्रतिकार केल्याने तिच्यावर चाकूचे वार करून सोनसाखळी हिसकावून पळून गेले आहेत. हि घटना ज्या परिसरात घडली त्या ठिकाणी दर काही दिवसांनी अशा घटना घडतात. मात्र तरीही पोलिसांनी उपायोजना न केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

दोनच दिवसांच्या पूर्वी रबाळे पोलिसांनी तीन अट्टल साखळी चोरांना अटक केली होती. एकाच वेळी तीन जण अटक केल्याने आता तरी साखळी चोरट्यांना निदान काही दिवस आळा बसेल असे वाटत असतानाच रबाळे पोलीस ठाणे हद्दीत असणाऱ्या ऐरोली सेक्टर २ येथे साखळी चोरीची घटना घडली.

ठाणे येथे नोकरी करणाऱ्या ५३ वर्षीय निर्मला पवार या सेक्टर २ येथून पायी जात होत्या. या परिसरात मॉर्निंग वॉक साठी जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. २४



तारखेला निर्मला पवार पहाटे पाचच्या सुमारास पायी जात होत्या. त्यावेळी त्यांच्या आसपास कोणी नाही हे दबा धरून बसलेल्या चोरट्यांनी हेरले. हे चोरटे दुचाकीवर त्यांच्या जवळ आले.

त्यांनी साखळी हिसकावण्याचा प्रयत्न केला मात्र पवार यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न करत असल्याचे लक्षात येताच त्या दोन चोरट्यापैकी एकाने चाकू काढून पवार यांचावर दोन वार केले. हे हात आडवा घालत वार अडवण्याचा प्रयत्न केल्याने त्यांचा उजव्या हाताचा पंजा आणि डावा हाताच्या कोपऱ्याला दुखापत झाली.

या झटापटीत पवार यांच्या गळ्यातील ६५ हजार रुपयांचा ५ ग्रॅम वजनाचा सोन्याचा पोट, सात हजार रुपये रोकड ठेवलेली पिशवी असा एकूण ७२ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरट्यांनी पळवला. हि घटना घडल्याने पवार यांनी अगोदर जखमांवर उपचार केले आणि त्या नंतर पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दाखल केली.

मात्र साखळी चोरी करताना साखळी घेऊन जाण्याच्या इराद्याने चोरटे निर्दयी होत हल्ला करणे, खाली पाडणे, हाणामारी करणे असे प्रकार वाढत असल्याने महिला वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यात गेल्या काही दिवसात एकट्या दुकट्या पुरुषांना हि अडवून चाकूचा धाक दाखवत साखळी चोरीच्या घटना घडल्याने साखळी चोरट्यांवर कठोर कारवाई करण्याचे आव्हान पोलिसांच्या समोर उभे ठाकले आहे. अशा घटनाला ज्या ठिकाणी घडतात ज्या वेळेत घडतात याचा अभ्यास करून त्या ठिकाणी निदान पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी ही केली जात आहे.

### पनवेलमध्ये घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**पनवेल :** वडघर गाव येथील एका घरात अज्ञात चोरे घुसून त्यांनी लाखो रुपये किमतीचा सोन्याचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. वडघर गाव येथे राहणारे सलीम शेख यांच्या घरात उघड्या दरवाजातून घरात प्रवेश करून सोन्याचे दागिने व ऑरा गाडीची चावी व रोख रक्कम असा मिळून जवळपास दोन लाख २७ हजार ५२० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याने याबाबतची टँकर पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## पाम बीच रोडवरील झाडांसाठी आंदोलन

**नवी मुंबई : बातमीदार**

पाम बीच रोडवरील ४४० झाडे वाचवण्यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला वेग देत पर्यावरणप्रेमींनी मंगळवारी सायंकाळी नवी मुंबई महानगरपालिका (मनपा) मुख्यालयासमोर शांत आंदोलन केले.



हातात बॅनर आणि फलक घेऊन ज्येष्ठ नागरिक, महिला, मुले आणि युवकांनी मानवी साखळी तयार करत अंडरपास प्रकल्पासाठी प्रस्तावित झाडतोडीविरोधात आपली चिंता व्यक्त केली.

पाम बीच ग्रीन्सचे संयोजक श्रीकांत पाटकी यांनी सांगितले की, झाडे स्थलांतरित करणे किंवा तोडणे या मनपाच्या योजनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे, विशेषतः शहरातील खालावत चाललेल्या हवा गुणवत्तेच्या पार्श्वभूमीवर. शहराच्या पर्यावरणीय आरोग्यासाठी हिरवाई अत्यंत महत्त्वाची आहे. प्रौढ झाडे तोडल्यास परिस्थिती आणखी बिघडेल, असे ते म्हणाले.

नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी मनपाला पाम बीच रोडवरील सानपाडा येथील मोराज जंक्शन येथे उड्डाणपूल किंवा एलिव्हेटेड रस्ता यांसारखे पर्याय विचारात घेण्याचे आवाहन केले. यामुळे शेकडो झाडे न तोडता लांब पल्ल्याच्या वाहतुकीस अखंड गती मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

नवी मुंबई एन्व्हायर्नमेंट प्रिझर्वेशन सोसायटीचे संदीप सरीन यांनी स्पष्ट केले की नागरिकांना पायाभूत सुविधांच्या विकासाला विरोध नाही, मात्र तो शाश्वत पद्धतीने व्हावा अशी अपेक्षा आहे. शहरी नियोजकांनी विकास आणि पर्यावरणीय सुरक्षितता यांचा समतोल साधला पाहिजे. प्रगती ही पर्यावरणाच्या किंमतीवर होऊ नये, असे ते म्हणाले.

## चिपळे ग्रामपंचायतीसाठी एक नवीन घंटागाडी उपलब्ध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल मतदारसंघात विकासकामांचा धडाका सुरू असून, नागरिकांना विविध नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. याचच एक भाग म्हणून, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आमदार विकास निधीतून चिपळे ग्रामपंचायतीसाठी एक नवीन घंटागाडी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या घंटागाडीचे लोकार्पण मंगळवारी भाजपचे प्रदेश परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

या लोकार्पण सोहळ्याला पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, सरचिटणीस यतीन पाटील, नेरे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, रमेश पाटील, संदेश फडके, गुरुनाथ फडके, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## विहिघर येथे आमदार चषक भव्य क्रिकेट स्पर्धा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशुर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून दोस्ती ग्रुप आणि श्री दत्त इलेव्हन (११) विहिघर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार चषक २०२६ या भव्य क्रिकेट स्पर्धेचा मंगळवारी विहिघर येथे उत्साहात प्रारंभ झाला. भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या शुभहस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.





विहिघर येथील साई मैदानात २४ ते २८ मार्च या कालावधीत हे सामने रंगणार असून, डे-नाईट स्वरूपातील या स्पर्धेमुळे क्रीडाप्रेमींमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. या स्पर्धेतील विजेत्या संघांसाठी भरघोस बक्षिसे ठेवण्यात आली असून, प्रथम क्रमांकास १ लाख २० हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ६० हजार रुपये, तर चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या क्रमांकासाठी प्रत्येकी ३० हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

उद्घाटनावेळी अरुणशेठ भगत यांच्यासह पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, सरचिटणीस यतीन पाटील, नेरे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, रमेश पाटील, संदेश फडके, गुरुनाथ फडके, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## नाईक नगर येथे श्री एकविरा देवी उत्सव



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यात धार्मिक उत्सवाची लगबग वाढली असून गावा गावात ग्रामदेवतांच्या यात्रा व् पालखी सोहळ्याची धूम सुरू झाली आहे. यंदाचे ४१ वर्षे आहे.

उरण तालुक्यातील नाईक नगर म्हातवली मित्र मंडळ ओएनजी सी कंपनी समोर मंगळवार (दि. २४) व बुधवार (दि. २५) रोजी दोन दिवसीय श्री एकविरा देवी उत्सव साजरा करण्यात आला आहे. आदित्य जयराम धनगर (पुजारी) यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार (दि. २४) पूजा, देवीची ओटी भरणे, अभिषेक व सायंकाळी सर्वांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. बुधवार ( दि. २५ )रोजी सायंकाळी पालखी व मिरवणूक काढण्यात येणार आहे.

कार्यक्रमास शारदा गावडे, गजराबाई बोडके, शमिना शेख, शिताबाई अप्पागले गीता गायकवाड, जयश्री कांबळे नीलम गायकवाड, मित्र परिवार आदींचे सहकार्य मिळणार आह.

## रामनवमी निमित्ताने आयोजक आणि शांतता कमिटी सदस्यांची बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

२४ मार्च रोजी मंथन हॉल, पनवेल येथे रामनवमी आयोजक आणि शांतता कमिटी सदस्य यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त पनवेल, भाऊसाहेब ढोले यांनी सूचना केल्या.

पालखी मिरवणूक दरम्यान वाहतुकीस अडथळा होणार नाही. यावेळी गर्दी व्यवस्थापन करून स्वयंसेवक नेमावे. ध्वनी प्रदूषण नियम आणि नियंत्रण नियमावली २००० चे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रशासनाशी समन्वय साधावा. कोणत्याही प्रकारचे प्रक्षोभक घोषणा, आक्षेपार्ह बॅनर, आणि पोस्टर लावू नयेत. नवी मुंबई व्हाट्सअप बाबत माहिती देऊन फॉलो करण्याबाबत सूचित करण्यात आले. यावेळी सायबर फ्रॉड बाबत थोडक्यात माहिती दिली तसेच अमली पदार्थांचे दुष्परिणाम व हेल्पलाइनची माहिती दिली.

कार्यक्रमादरम्यान वापरण्यात येणाऱ्या लेझर लाईटचा वैमानीकांना त्रास होत असून लेझर लाईट न वापरण्याचे सूचित करण्यात आले. या बैठकीला खांदेश्वर पोलीस ठाण्याचे स्मिता ढाकणे, पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे गजानन घाडगे, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे नितीन ठाकरे, अभिजीत अभंग उपस्थित होते.

## मंत्री तटकरेंच्या हस्ते सीमा बढेंचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित 'महाराष्ट्र उड्डाण २०२५-२६' या एक दिवसीय राज्यस्तरीय पूर्व प्राथमिक शिक्षण परिषदेमध्ये प्रमुख अतिथी महिला बालविकासमंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते पनवेल तालुक्यातील चिखले येथील सीमा प्रताप बढे यांचा सन्मान करण्यात आला.



बालकांच्या आयुष्यातील पहिले १००० दिवस हे त्यांच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासासाठी अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचे असतात. या कालावधीत अंगणवाडी स्तरावर राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करण्यासाठी शासन पूर्णतः कटिबद्ध असून आजच्या या परिषदेत राज्यातील उत्कृष्ट काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका यांचा सन्मान या कार्यक्रमात करण्यात आला.

## नवी मुंबई मनपा शिक्षण व्यवस्थेत करणार बदल

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी 'शिक्षण रूपांतर धोरण २०२६' पुढे आले असून, यामुळे महापालिका शाळांचा चेहरामोहरा बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सोमवारी पार पडलेल्या महासभेत सभागृह नेते सागर नाईक यांनी हा प्रस्ताव मांडला.



अंतिम निर्णय मात्र पुढील महासभेत सूचनांसह घेतला जाणार आहे. महापालिका शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाचा टप्प्याटप्प्याने विस्तार हा या धोरणाचा केंद्रबिंदू आहे. केवळ श्रीमंतांपुरतेच मर्यादित न राहता गोरबगरीब विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षणाची समान संधी मिळावी, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे सागर नाईक यांनी सभागृहात स्पष्ट केले.

मात्र, मराठी भाषेचे स्थान अबाधित राखले जाईल आणि तिच्या संवर्धनासाठी स्वतंत्र उपाययोजना केल्या जातील, असेही त्यांनी नमूद केले. नव्या शैक्षणिक वर्षापासूनच या धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्याचा महापालिकेचा मानस आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक पद्धतीतही बदल प्रस्तावित आहेत. चौथी आणि सातवी इयत्तेत बुद्धिमत्ता चाचण्या, सातवीपासूनच कौशल्याधारित शिक्षणाचा समावेश, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या आधुनिक विषयांचा अभ्यासक्रमात समावेश, क्रीडा आणि शारीरिक विकासालाही धोरणात महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.

या बदलांमुळे महापालिका शाळांची गुणवत्ता उंचावेल आणि विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाशी जोडले जाईल, असा महापालिकेचा दावा आहे, मात्र विरोधकांनी शाळांची सध्याची स्थिती लक्षात घेऊन आधी मूलभूत सुविधा सुधारण्याची गरज व्यक्त केली आहे.

> **सीबीएससी शाळा न करता एसएससी बोर्डाच्या महापालिका शाळांमध्येच इंग्रजी शिक्षण देण्याचा आमचा मानस आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून बालवाडीत इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेणार आहोत, मात्र शाळांमधील मराठी माध्यमाचा पर्यायही कायम राहील. मराठी भाषेला कोणतीही बाधा पोहोचणार नाही.**
>
> **–सागर नाईक, सभागृह नेते, नमुंमपा**


## आंबा संरक्षणासाठी कृषी विभागातर्फे प्रात्यक्षिक

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील आंबा पिकावर पडणारे फळमाशीचे आक्रमणाला रोखण्यासाठी फळ रक्षक सापळे लावण्यात आले असून, त्याचे प्रात्यक्षिक उरण तालुक्यातील चिरनेर येथील आंबा बागायतदार शेतकऱ्यांच्या बागेत उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ यांच्या मार्गदर्शनाखाली दाखविण्यात आले.

यावेळी उरणच्या कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड यांनी फळ रक्षक सापळ्याच्या मदतीने बागायतदारांना आंबा फळांच्या रक्षणाची प्रात्यक्षिके करून दाखविली. यामध्ये रक्षक सापळा हा सावलीत जमिनीपासून तीन ते चार फूट उंचीवर लावून, दोन सापळ्यातील अंतर ठेवून रक्षक सापळे आंबा झाडाला टांगून, प्रथम सापळ्यातील डबीत अळ्या-कीटकांना आकर्षित करणारे मोहगंध औषध ठेवून, त्यानंतर प्लास्टिक बरणीच्या बुडाशी अर्धा लिटर साबणाचे पाणी भरून बरणीच्या हुकाची बांधणी करून घ्यावी.

त्यानंतर पंधरा दिवसाच्या अंतराने किंवा रक्षक सापळ्यात अडकलेल्या माशांच्या



प्रमाणानुसार बरणी स्वच्छ करून घ्यावी. माशांना आकर्षित करून घेणाऱ्या मोहगंधाच्या औषधाचा वापर दिलेल्या सूचनेनुसार व कालमर्यादेनुसार करावा, अशी माहिती कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड यांनी शेतकऱ्यांना प्रात्याक्षिकांतून दिली.

तालुक्यातील कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, जगदीश ठाकुर, भास्कर ठाकूर, दामोदर मुंबईकर, अस्मित ठाकूर समाधान पाटील यांच्यासह अन्य शेतकरी व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. उरण तालुका हा कृषीप्रधान तालुका आहे. येथे पावसाळी हंगामात प्रामुख्याने भात पिकाची लागवड केली जाते.

नैसर्गिक पावसाच्या पाण्यावर आधारित असलेले हे पीक येथील शेतकऱ्यांचे मुख्य पीक असून, अधिक उत्पादन देणारे व शाश्वत पीक आहे. भात पिकाबरोबर तालुक्यात आंबा पीकही मोठ्या प्रमाणावर घेतले जात आहे. मात्र बदलत्या हवामानाचा फटका तालुक्यातील आंबा फळ पिकांना बसत आहे. त्यामुळे आंबा बागायतदारांना मनुष्यबळाचा आधार घेत औषध फवारणी करावी लागत आहे.

### उरण तालुक्यात १६४ हेक्टर आंबा पीक

फळ माशांना थोपविण्यासाठी रक्षक सापळे उपयुक्त ठरणार आहेत. उरण तालुक्यात आंबा पिकाच्या लागवडीखाली एकूण क्षेत्रफळ १६४.९७ हेक्टर इतके आहे. शासनाच्या कृषी विभागाने आंबा बागायतदारांसाठी अनेक नावीन्यपूर्ण योजना राबविल्या आहेत. ही नावीन्यपूर्ण रक्षक सापळा योजना तालुक्यात राबविली जात आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# अफवांमुळे पेट्रोल पंपांवर झुंबड

## कर्जतमध्ये रात्रीपासून वाहनांच्या रांगा; अचानकच्या गर्दीने इंधनसाठा संपला

**नेरळ : बातमीदार**

इंधनाचा तुटवडा निर्माण होणार किंवा पुरवठा बंद पडणार असल्याच्या अफवांमुळे कर्जत तालुक्यात काल रात्रीपासून आज दुपारपर्यंत पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या. अचानक वाढलेल्या गर्दीमुळे काही ठिकाणी मर्यादित इंधनसाठा संपल्याने संबंधित पंप मालकांना काही काळासाठी पंप बंद करण्याची वेळही आली.



मंगळावर २४ मार्च रोजी रात्री आठ वाजल्यापासूनच तालुक्यातील अनेक पेट्रोल पंपांवर वाहनांची गर्दी वाढू लागली होती. ही गर्दी रात्रभर कायम राहिली आणि आज पहाटेपासून दुपारपर्यंतही अनेक ठिकाणी रांगा सुरूच होत्या. कर्जत–कल्याण राज्य मार्गावरील नेरळजवळील HP पेट्रोल पंपावर सर्वाधिक गर्दी दिसून आली. येथे वांगणी, बदलापूरसह बाहेरील भागांतील वाहनचालकांनीही मोठ्या प्रमाणात धाव घेतली होती.

वडवली येथील पेट्रोल पंपावर मध्यरात्री दीड वाजेपर्यंत वाहनांच्या रांगा होत्या. कर्जत शहर, कशेळे, कडाव, कळंब या भागांतील पेट्रोल पंपांवरही अशीच परिस्थिती होती. CNG पंपांवरही मोठी गर्दी झाली होती.एवढेच काय तर घरगुती वापरण्यात येणाऱ्या गॅस साठी ही गर्दी संबंधित ठिकाणी होती.

या अफवांचा परिणाम असा झाला की, नेहमी १०० ते २०० रुपयांचे थोडे पेट्रोल भरणारे अनेक वाहनधारकही काल 'टाकी फुल' करताना दिसले. डिझेलसाठी मोठ्या वाहनांच्या रांगा लागल्या होत्या, तर काही ठिकाणी ड्रम, बाटल्या आणि इतर भांड्यांमध्ये इंधन साठवून नेण्याचाही प्रयत्न झाल्याचे दिसून आले.

नेरळ परिसरातील काही पेट्रोल पंपांवर परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. नागरिकांना शिस्तीत रांगा लावण्याचे आणि अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.दरम्यान, शासन आणि प्रशासनाकडून इंधनाचा कुठेही तुटवडा नसून पुरवठा सुरळीत सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, सोशल मीडियावरील अफवा आणि भीतीमुळे तालुक्यात कृत्रिम ताण निर्माण झाल्याचे या प्रकारातून स्पष्ट झाले.

# मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर कार आगीच्या भक्ष्यस्थानी

**खोपोली, खालापूर: प्रतिनिधी**

मुंबई पुणे जुन्या महामार्गांवर बोरघाटात काल रात्री कारला भीषण आग लागली असून या आगीत कार पूर्णपणे जळून खाक झाली आहे



मुंबई पुणे जुन्या महामार्गवरून क्रेटा कार क्रमांक( MH १४ JM ५९९९ ) हा चालक नितीन गजानन साळुंखे ( वय ४१ रा संत तुकाराम नगर पिंपरी पुणे ) हा आपली कार घेऊन खोपोलीहुन पुण्याकडे घेऊन जातं असताना कार खिंडीत आली असता अचानक गाडी गरम होऊन कारला भीषण आग लागली कारला आग लागल्याचे चालकाच्या तात्काळ लक्षात आल्याने कार थांबवून तो बाहेर पडल्याने मोठी जीवितहानी टळली

या घटनेची माहिती मिळताच खोपोलीचे अग्निशमन दल, आयआरबी टीम, अपघातग्रस्त टीमचे सदस्य तात्काळ घटनास्थळी दाखल होत आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले मात्र या आगीत कार पूर्णपणे जळून खाक झाली आहे

# रायगडात मशिदीत 'समता इफ्तार'

## संविधानिक मूल्यांसह सामाजिक ऐक्याचा संदेश

**पाली : प्रतिनिधी**

'चला संविधानिक मूल्यांसह इफ्तार करूया' या प्रेरणादायी संकल्पनेतून एका आगळ्यावेगळ्या 'समता इफ्तार' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'शिवराय ते भिमराय समता मार्च' या उपक्रमांतर्गत महाड येथे मशिदीमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाने सामाजिक सलोखा आणि बंधुतेचा एक नवा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

संविधान गुण गौरव समितीचे नुरखाँ पठाण यांनी यावेळी संविधानाबद्दल माहिती देऊन मार्गदर्शन केले. याप्रसंगी विविध समाजघटकांनी एकत्र येत इफ्तारमध्ये सहभाग नोंदवला. केवळ उपवास सोडणे एवढ्यापुरता हा कार्यक्रम मर्यादित न राहता, समाजात समता आणि सामाजिक ऐक्याची भावना दृढ करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान 'भारतीय संविधान आणि इस्लाम  समता व बंधुतेचा संदेश' या विषयावर विशेष मार्गदर्शन करण्यात आले. संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूलभूत मूल्ये आणि इस्लामची शिकवण यांच्यात असलेले सखोल साम्य यावेळी मांडण्यात आले. मानवी मूल्ये जपण्यासाठी संविधानिक जाणीव असणे किती आवश्यक आहे, यावर नुरखाँ पठाण यांनी प्रकाश टाकला.

या उपक्रमाला उपस्थित नागरिकांकडून उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद मिळाला. सध्याच्या काळात अशा प्रकारचे कार्यक्रम सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्यासाठी आणि संविधानिक मूल्ये तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.



# जागतिक क्षयरोग दिनानिमित्त जिल्ह्यात विविध जनजागृती उपक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

जागतिक क्षयरोग दिनाच्या निमित्ताने जिल्ह्यात विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अलिबाग समुद्रकिनारा येथे आयोजित मिनी सरस प्रदर्शन व विक्री महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमादरम्यान क्षयरोग निर्मूलनासाठी विशेष कार्यक्रम संपन्न झाला.



यावेळी राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते क्षयरोग निर्मूलनासाठी योगदान देणाऱ्या 'निक्षय मित्र' यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हयात विविध ठिकाणी टी बी डे साजरा करण्यात आला व त्यानिमित्ताने क्षयरुग्णांना पोषण आहार किट (फूड बास्केट) देखील वितरित करण्यात आले.

कार्यक्रमास उपाध्यक्ष मधुकर पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे, अभिनेते भाऊ कदम, अभिनेत्री संजना काळे, आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील, सभापती तथा गटनेते वैकुंठ पाटील, नारायण डामसे, रसिका केणी, जि. प. सदस्या मानसी दळवी, जि. प. सदस्य अमित नाईक, जनार्दन भस्मा, प्रभाकर म्हात्रे, संतोष बैलमारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जालिंदर पठारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विशाल तनपुरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांच्यासह विविध पदाधिकारी, अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ३० मार्च रोजी दासगावच्या श्री काल भैरवाचा जत्रोत्सव

**महाड : प्रतिनिधी**

दासगाव गावचे ग्रामदैवत श्री कालभैरवाचा जत्रोत्सव दिनांक ३० मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष रितेश पयेलकर यांनी दिली. सालाबाद प्रमाणे या होणाऱ्या उत्सवा मध्ये मोठ्या संख्येने भाविकांनी हजर होऊन दर्शन घेण्याचे आवाहन उत्सव कमिटी मार्फत करण्यात आले आहे.

दासगाव गावातील हे ग्रामदैवत परिसरातील गावांचे श्रद्धा स्थान आहे. मंदिरातील देवदेवतांना चांदीचे मुखवटे लावून जत्रोत्सव सुरू होतो.दरवर्षी गुढी पाडव्यानंतर येणारा या  उत्सवामध्ये सर्व जाती जमातीचे लोक मोठ्या उत्साहाने सहभागी होत असतात. त्यामुळे या उत्सवाला परिसरात एक वेगळेच स्थान आहे.

३० मार्च रोजी होणाऱ्या या उत्सवानिमित्त दुपारी ३ वा. मंदिरातील देव देवतांच्या मूर्तींची स्थापना करून उत्सवास प्रारंभ होणार आहे. ४ वा. नवीन बगाडावर लाट फिरवण्यात येईल.

# देवळी गावात ऑईस्टर मशरूम शेतीचा किरण भोजने यांचा अभिनव उपक्रम

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील देवळी गावातील उत्तम भाजीपाला विक्रेते म्हणून ओळख असलेले किरण भोजने यांनी आपल्या घरीच ऑईस्टर मशरूमची आधुनिक शेती सुरू करून एक आदर्श निर्माण केला आहे. "माऊली मशरूम फार्म" या नावाने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे गावात शेतीतील नव्या संधींचे दालन खुले झाले आहे.




किरण भोजने यांनी कमी जागेत, कमी खर्चात आणि वैज्ञानिक पद्धतीने मशरूम उत्पादन करून चांगले उत्पन्न मिळवण्याचा मार्ग निवडला आहे. त्यांच्या या उपक्रमाची माहिती मिळताच देवळी ग्रामपंचायतचे सरपंच विनेश यशवंत डवळे, उपसरपंच तसेच ग्रामस्थांनी माऊली मशरूम फार्मला सदिच्छा भेट दिली.

यावेळी त्यांनी मशरूम शेतीची पाहणी करून किरण भोजने यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी अशा प्रकारचे पूरक व्यवसाय ग्रामीण भागातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरत असून रोजगारनिर्मितीसाठीही उपयुक्त असल्याचे मत व्यक्त केले. शेतीसोबत जोडधंदा म्हणून मशरूम शेतीकडे पाहण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

या भेटीदरम्यान किरण भोजने यांनी सांगितले की, "गावातील सर्व मान्यवर व ग्रामस्थांचा मिळालेला पाठिंबा हा आमच्यासाठी मोठा आत्मविश्वास देणारा आहे.

आपल्या सर्वांच्या अमूल्य सहकार्यामुळे आम्ही पुढेही प्रगती करत राहू. आपले आशीर्वाद असेच कायम राहू द्या."देवळी गावात सुरू झालेला हा "माऊली मशरूम फार्म" भविष्यात इतर शेतकरी व युवकांसाठी प्रेरणास्थान ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# आई एकविरा देवीच्या दरबारी रोह्यातुन पाच पदयात्रा

**धाटाव : प्रतिनिधी**

लोणावळा नजिक कार्ला येथे चैत्र महीन्यात साजरा होणाऱ्या आई एकविरा देवीच्या पालखी सोहळयासाठी रोहा येथुन सालाबादप्रमाणे शेकडो भक्तगण पदयात्रा काढुन पायी चालत सोमवारी कार्ला डोंगराकडे निघाले. यंदा रोहा तालुक्यातुन सुमारे सहाशे भक्तगणांनी कार्ला डोंगराकडे कुच केली असुन भल्या पहाटे या पदयात्रा रोहा येथुन मार्गस्थ झाल्या आहेत. बुधवारी २५ मार्चला कार्ले येथील आई एकविरा देवीचा पालखी उत्सव साजरा होणारा आहे.



रोहा शहरातील धनगर आळी मंडळ, रोठखुर्द गावातील जय भवानी मंडळ, झोलांबे येथिल हनुमान सेवा मंडळ, खारापटी येथिल आई एकविरा पालखी पदयात्रा मंडळ आणि निडी येथिल पदयात्रा मंडळाच्या माध्यमातुन चैत्र महीन्यातील कार्ला येथिल आई एकविरा देवीच्या पालखी सोहळयासाठी दरवर्षी शेकडो भक्तगण पदयात्रा काढुन पायी चालत जातात, कार्ला डोंगरावर जाउन आईंच्या चरणी आपली सेवा रूजु करीत असतात. गेली काही वर्ष हे भक्तगण येथुन पालखी सोहळयाच्या दर्शनासाठी पदयात्रा काढुन जात आहेत.

यावर्षी पाचही पदयात्रांमध्ये अंदाजे सहाशे भक्त सहभागी झाले आहेत. रविवार पासुनच पदयात्री भक्तांची लगबग सुरू झालेली, रोठखुर्द, खारापटी आणि निडी येथिल पदयात्रेचे रविवारी प्रस्थान झाले तर झोलांबे व धनगर आळी रोहा येथील पदयात्रा सोमवारी पहाटे येथुन मार्गस्थ झाल्या. साधारण दोन दिवस पायपिट करून ही मंडळी कार्ला गडावर पोहचते. पदयात्रेत भक्ती, भजन, नामस्मरण आदी कार्यक्रम संपन्न होतात.

या पदयात्रा आपापल्या पालखीसोबत वाकण, पाली, रासळ ,जांभुळपाडा खोपोली, खंडाळा, लोणावळा, आदी ठिकाणी थांबा घेत एकविरा गडावर पोहचतात. परतीच्या प्रवासात रोहा येथे आल्यानंतर काहींची धाविर महाराजांचे दर्शन घेत पालखीची शहरातून भव्य मिरवणुक काढली जाते.

# बाहे येथील खेळू थिटे यांनी मिरची पिकातुन घेतले भरघोस उत्पादन

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील बाहे हे गाव भाजीपालासाठी पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. पारंपारिक लागवडीपासून विविध प्रयोग करीत आज येथील शेतकरी शेतीतून चांगले उत्पादन काढून चांगले उत्पन्न मिळवत आहेत. यातीलच बाहे येथील प्रयोगशील शेतकरी खेळु थिटे यांनी कमी जागेत शास्त्रोक्त पद्धतीने लागवड करून मिरची पिकातून भरघोस उत्पादन काढत आहेत. त्यांचा झालेला यशस्वी प्रयोग नवीन शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे.



मुळातच खेळू थिटे यांच्याकडे शेती कमी परंतु जिद्द, मेहनत च्या जोरावर शेतीतून चांगले उत्पन्न मिळते हे त्यांनी गेले कित्येक वर्ष सिद्ध केले आहे. लाखोचे उत्पन्न कमी शेतीत कसे काढता येते. हे त्यांनी नविन शेतकऱ्यांसमोर उदाहरण ठेवला आहे..

स्वतःची दीड एकर व सामायिक अडीच एकर असे एकूण चार एकर मध्ये त्यांनी या वर्षी शेतीमध्ये लागवड केली आहे. यावर्षी सितारा या जातीची मिरचीची लागवड पाऊण एकर मध्ये त्यांनी नोव्हेंबरच्या सुमारास केली होती.जवळजवळ ८० हजाराच्या आसपास त्यांना या लागवडीचा खर्च आला. चांगले नियोजन व संगोपन केल्याने मिरचीचे पीक आता बहरत आहे.त्यांनी आतापर्यंत तीन तोडे केले आहेत. जिल्ह्यातील व्यापारी शेतावर मिरची खरेदी करण्यासाठी येत आहेत. यावेळी त्यांना ४० ते ६० रुपये किलोमागे भाव मिळाला आहे. सरासरी दीड लाखाच्या आसपास उत्पन्न मिळाले आहे अजूनही दोन ते तीन तोडे होणार असल्याचे त्यांनी सांगितले. अंदाजे किमान अडीच लाखाच्या आसपास पाऊण गुंठ्यात त्यांना नफा मिरची या पिकातून मिळण्याची शक्यता आहे. भावात चढ–उतार सातत्याने होत आहे. अजूनही उत्पादन त्यांचे मिरची या पिकातून आहे.

त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या पाऊण एकर मध्ये त्यांनी यावर्षी प्रायोगिक तत्त्वावर कलिंगडाची ही लागवड केली आहे. अडीच हजार रोपे त्यांनी यावेळी कलिंगडाची पाउण एकर मध्ये लावले होते. कलिंगड चेही चांगले पिक आल्याने त्यांना चांगले उत्पन्न मिळाले आहे. सरासरी १५ चा भाव किलोमाग मिळाला असून जवळ जवळ १० टन कलिंगडाचे उत्पादन यावेळी निघाले आहे. किरकोळ बाजारात त्याची विक्री होत आहे. मिरची या पिकासोबत कलिंगडाच्या पिकातूनही त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे.

सध्या ते पाऊण एकरामध्ये भेंडीचे लागवड केली आहे राधिका या जातीचे लागवड त्यांनी केली आहे. सातत्याने शेतीमध्ये प्रयोग करणे वेगवेगळ्या प्रकारच्या जातीचे पीक घेणे जिद्द, मेहनत, नियोजन करत असल्याने खेळु थिटे शेतीतून चांगले अर्थकारण होत असल्याचे दिसून येते.

**रोहा सारख्या बाजारपेठेत स्थानिक शेतकऱ्यांना उत्पादन विक्रीसाठी जागा उपलब्ध नसल्याने स्थानिक बाजारपेठ मिळत नाही. स्थानिक बाजारपेठेत जागा बसण्यासाठी जागा मिळाल्यास चांगले उत्पन्न त्यांना मिळू शकते. यासह रोहेकरांना ताज्या भाज्या खाण्यासाठी मिळू शकतात.**
**–खेळु थिटे**
प्रयोगशील शेतकरी बाहे

# चैत्राच्या आगमनाने रानफुले बहरली

**माणगाव : प्रतिनिधी**

मार्च महिन्यात उन्हाचा पारा चढत असताना रानावनात मात्र उन्हाळी रानफुलांचा बहर आला आहे. चैत्र महिना सुरू झाल्यानंतर रानावनात झाडांना पालवी फुटली असून या पालवीतच बहावा,निवडुंग ,गुलमोहर इत्यादी वृक्षांना मोठ्या प्रमाणात फुलांचा बहर आला आहे. रानावनात झाडांना पालवी बरोबरच आलेला हा बहर निसर्गप्रेमी ,पर्यटक यांच्या आकर्षणाचा विषय होत असून निसर्गातील उन्हाळ्याच्या काहिलीत बहरणारी रानफुले निसर्गाची शोभा वाढवित आहेत.



उन्हाळा हा काहीसा उदासवाना ऋतू असतो.झाडांची पानगळ,उन्हाची वाढणारी काहीली व भकास वाटणारे रान असे काहीसे चित्र सर्वत्र दिसते.मात्र याच ऋतूत रानातील अनेक फळ झाडे ,फुल झाडे फुलून येतात यामुळें उन्हाळ्याच्या दिवसात रानाची शोभा वाढत असून रानावनात झाडांना उन्हाळी रान फुलांचा, फळांचा बहर आलेला दिसत आहे. कोकणातील सह्याद्री पर्वताची कडे कपारीत ,रस्त्यांच्या दुतर्फा ,शेत शिवारात असंख्य प्रकारच्या फळ ,फुल झाडांना पालवी बरोबरच फुलांचे गुच्छ आले आहेत.एरवी उन्हाळा रुक्ष, उदास वाटतो मात्र रानावनात फुलणाऱ्या उन्हाळी रान फुलांनी उन्हाळ्यातही निसर्ग आपली शोभा कायम ठेऊन सुंदरता कायम राखत आहे. चैत्र महिन्यातील हे निसर्ग सौंदर्य पाहून निसर्गप्रेमी ,पर्यटक समाधान व्यक्त करीत आहेत



**उन्हाळा वाढत असताना रानावनात असंख्य प्रकारच्या झाडा, वेलीना फुलांचा बहर आला आहे.हा बहर रानावणाची शोभा वाढत आहे.रानात बहरलेली ही फुले पाहणे अतिशय आनंदाचे आहे .ही फुले ऐन उन्हाळ्यात फुलतात. या नंतर काही दिवसांनी पावसाळा सुरू होईल.पावसाळा जवळ आल्याचे उन्हाळी रान फुले संकेत देतात.**
**–विलास देगावकर,**
फुल निरीक्षक,माणगाव.

# नांदगाव व मुरुड शहरातील बीएसएनएलचे नेटवर्क ठप्प

**मुरुड : प्रतिनिधी**



एकेकाळी सर्व दूर ख्याती असणारा व गोर गरीब जनतेचा कैवारी असणाऱ्या बीएसएनएल मोबाईल टॉवर बाबत खूप प्रशंसा केली जात असे परंतु दिवस बदली झाले केंद्र शासनाने खाजगी कंपनी यांच्या मोबाईल टॉवर यांचा फायदा करण्यासाठी सुप्रसिद्ध व चांगली सेवा देणाऱ्या बीएसएनएल मोबाईल टॉवर कडे दुर्लक्ष्य करून जास्त दिवस सेवा बंद कशी राहील याकडे लक्ष देऊन आपल्याच ग्राहकांना इतर मोबाईल कंपनी यांना फायदा होण्यासाठी बीएसएनएल सेवा जास्तीत जास्त बंद ठेवल्यामुळे ग्राहकाला याचा मोठा मनस्ताप होत असून सुध्दा दुर्लक्ष करणाऱ्या बीएसएनएल कंपनीच्या सेवेचा पुरता बोजवारा उडाला आहे.

मुरुड तालुक्यात बीएसएनएल कंपनीचे विविध ठिकाणी मोबाईल टॉवर आहेत.परंतु नेटवर्क सतत बंद असल्याने मुरुड तालुक्यातील बीएसएनएल ग्राहक हैराण झाले आहेत.तक्रार करून सुद्धा दुरुस्ती कडे कानाडोळ केल्याने ग्राहकांनी दाद कोणाकडे मागावी हा येथे प्रश्न निर्माण झाला आहे.

नांदगाव शहरातील बीएसएनएल मोबाईल नेटवर्कची सेवा गेले सहा दिवसांपासून ठप्प झाल्याने ग्राहक अक्षरक्ष हैराण झाले असून कोण वायफाय देता का वायफाय?, अशी विचारणा ग्राहकांकडून होत आहे. मोबाईल नेटवर्ककरिता नांदगाव गणपती मंदिराजवळ बीएसएनएलचे टॉवर आहे. या टॉवरवरुन नांदगाव परिसरातील मोबाईलधारकांना या रेंजचा फायदा होत असतो. परंतु हा टॉवर गेले सहा दिवसापेक्षा जास्त दिवसांपासून नेटवर्क डाटा सेवा ठप्प झाल्याने मोबाईल नेटवर्क सेवा पुर्णतः बंद पडली आहे.

शहरात मोबाईल नेटवर्ककरिता अनेक खासगी कंपन्यांचा नेटवर्क फुल असून ते चांगली सेवा देत आहे. परंतु बीएसएनएलची मोबाईल नेटवर्क सेवा कधीही ठप्प होते. हे आता दररोजचे झाले आहे. गेले अनेक दिवस नेटवर्क डाटा अभावी गावातील व शहरातील विद्यार्थी, नोकरदार, वृत्तपत्र वाचक, पत्रकारांना ऑनलाईन काम करण्याची गैरसोय होत आहे. कामाकरिता कोणी वायफाय देता का वायफाय?, सध्या बीएसएनएलची धारकांची ही परिस्थिती आहे. मुरुड शहर व ग्रामीण भागात नेटवर्क गेली अनेक दिवसबंद असल्याने ग्राहक खूप वैतागले आहेत.

बीएसएनएलचे अधिकारी गोविंद जायकर यांना मोबाईल नेटवर्क डाटा चालत नसल्यच्या समस्येबाबत विचारणा केली असता अधिकारी गांभीर्याने दखल घेताना दिसत नाही. रेंज आज होईल उद्या होईल हेच उत्तर मिळत आहे. परंतू नेटवर्कचा डाटा मिळत नाही. मोबाईल नेटवर्क सुरळीत होताना दिसत नाही. ग्राहक अक्षरशः हैराण झाला आहे.

या बाबत नांदगाव ग्रामपंचायत चे माजी सदस्य सचिन पाटील यांनी बीएसएनएल मोबाईल नेटवर्क बाबत कमालीची नाराजी व्यक्त केली आहे. नांदगाव सारख्या मुख्य भागात व मुरुड शेअर बीएसएनएल सेवा वारंवार खंडित होत आहे. या सेवेमध्ये सात्यत नसल्याने अनेक ग्राहक हैराण झाले आहेत. तक्रार करून सुद्धा बीएसएनएल अधिकारी वर्ग लक्ष देत नसल्याने नेटवर्क पॅकेज चे पैसे फुकट जात आहेत. बीएसएनएल यांच्या अधिकारी वर्गाने आपला कारभार सुधारावा अन्यथा अनेक ग्राहक यांना सोबत घेऊन मोठे जनादोलन छेडू असा इशारा सचिन पाटील यांनी दिला आहे.

# पेणमधील बेकायदा वेश्या व्यवसायावर पोलिसांचा छापा

**पेण : प्रतिनिधी**




पेण तालुक्यातील बोरगांव येथील सेलीब्रेशन रिसोर्टमध्ये चालु असलेला बेकायदेशीर वेश्या व्यवसायावर पेण पोलीसांनी छापा टाकून आरोपींना अटक करुन ३ पिडीत महिलांची सुटका करण्यात आलेली आहे

याबाबत माहिती अशी की, बोरगांव ता. पेण हद्दीत सेलीब्रेशन रिसोर्टमध्ये बेकायदेशीररित्या वेश्याव्यवसाय चालत असल्याची माहिती पेण पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांना मिळाल्याने त्यांनी याची माहिती वरिष्ठांना दिली. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे छापा कारवाई करीता वेगवेगळे दोन पथक तयार करण्यात आले.

या पथकांना योग्य त्या सुचना देउन या बातमीची खात्री करण्याकरीता संदीप बागुल स्वतः व नेमलेल्या दोन पथकासह बोरगांव येथील सेलीब्रेशन रिसोर्टमध्ये सोमवार दिनांक २३ मार्च रोजी दोन बनावट ग्राहक पाठवुन कारवाई केली. या कारवाईत आरोपी झुल्फीकार जलाल उद्दीन वय ३० वर्षे रा. कोनगाव– पनवेल व तेथील कामगार खगेंद्र मलीक वय ४३ रा. पेण व देवेंद्र पाटील वय ३६ वर्षे रा.पेण, व कुंटणखाना चालविणारा आरोपी रविंद्र खेत्रमोहन मलीक वय ३२ वर्षे रा. कुरूळ ता. अलिबाग यांने संगनमताने वेश्याव्यवसायासाठी ३ महिला आणुन स्वतः चे आर्थिक फायदयासाठी कुंटणखाना चालवुन त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेतला म्हणुन कारवाई करण्यात आली या छाप्यात २१०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन सदर आरोपी विरूध्द पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपीना अटक करुन वेश्याव्यवसायासाठी आणलेल्या ३ पिडीत महिलांची सुटका करण्यात आलेली आहे. आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता ३० मार्चपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

ही कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती आँचल दलाल, अप्पर पोलिस अधिक्षक अभिजीत शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली व.उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, यांच्या सूचनेप्रमाणे पोलीस निरीक्षक संदीप बागुल, सहा. पोलीस निरीक्षक निलेश राजपूत महिला पोलिस निरीक्षक श्रीमती शिल्या वेंगुर्लेकर, सहा. पोलीस उपनिरीक्षक, श्री. घरत, पोह श्रीमती भोईर, पोहव सागर खांटकर, पोह निलेश कदम, मपोह. सुषमा भोईर, मपोशि रोहीणी भोईर यांनी केली .

# अवसरेमधील रक्तदान शिबिरात ३२ जणांचे रक्तदान

**कर्जतः प्रतिनिधी**



तालुक्यातील नेरळ भागातील ग्रामस्थ मंडळ अवसरे व जय भवानी ग्रामस्थ मंडळ अवसरे यांच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये ३२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले हे कर्जत – खालापूर तालुक्यातील ५३५ वे रक्तदान शिबीर ठरले.

अवसरे येथील भवानी माता मंदिरामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन आयोजित करण्यात आले होते.याप्रसंगी एकूण ३२ रक्तदात्यांनी रक्तदान करून राष्ट्रीय, सामाजिक व मानवतावादी कार्य करून सहकार्य केले.

या रक्तदान शिबिरात रक्तसंकलनाचे कार्य बदलापूर येथील माया रक्त केंद्राचे एम. एस. डब्ल्यू अजय भिसे व इतर रक्तसेवकांनी केले.

# विविध कृषी पुरस्कारांकरीता शेतकऱ्यांना अर्जाचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य हे कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो. यामध्ये डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे. सदर पुरस्कार मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते प्रदान करून संबंधितांना सन्मानित करण्यात येते.

यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतीमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव बनविण्यासाठी खर्च येत असल्याने सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपारिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे. ही प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे. संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढणार असून पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्वासार्हता व परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे.

तसेच शेतकऱ्यांना पुढीलप्रमाणे फायदा होणार आहे. ऑनलाईन प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या अर्ज सादर करता येणार. ऑफलाईन चार प्रतींमधील प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणारा वेळ व खर्च वाचून प्रस्ताव सादरीकरण जलद गतीने होणार आहे.

इच्छुक शेतकरी/ व्यक्ती/ संस्था/गट यांना सन २०२५ पासूनचे विविध कृषी पुरस्कार बाबतचे विविध कृषी पुरस्काराकरीता दि.३१ मार्च २०२६ अखेरपर्यत व डॉ. विठठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्काराकरीता दि. १५ एप्रिल २०२६ अखेर पर्यत अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करण्याकरिता मा.आयुक्त कृषी यांनी आवाहन केले आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी तात्काळ आपला अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करावा.

# नवघर शाळेत 'शाळा प्रवेशोत्सवा'ने गुढीपाडवा साजरा

**पाली : प्रतिनिधी**




नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आणि गुढीपाडव्याचे औचित्य साधून सुधागडाच्या नवघर शाळेत बुधवार दि. ( २४) 'गुढीपाडवा पट वाढवा अभियान' अंतर्गत इयत्ता पहिलीच्या मुलांचा 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या थाटात संपन्न झाला.

यावर्षी इयत्ता पहिलीसाठी एकूण ८ विद्यार्थी दाखलपात्र होते, त्यापैकी ५ विद्यार्थ्यांनी आज आपल्या पालकांसोबत उपस्थित राहून शाळेत औपचारिक प्रवेश घेतला.शाळेच्या पहिल्याच दिवशी मुलांच्या मनात शिक्षणाविषयी गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने नवागत विद्यार्थ्यांना पुष्प, खाऊ आणि शैक्षणिक साहित्य देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेत तयार करण्यात आलेला 'सेल्फी पॉईंट'. याठिकाणी माता पालक आणि पाल्यांचे फोटो काढून हा क्षण अविस्मरणीय करण्यात आला.

मार्गदर्शन आणि उपक्रम कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक होते. त्यांनी आपल्या मनोगतातून नवीन मुलांचे शालेय कुटुंबात स्वागत केले. उपशिक्षक. राजेंद्र अंबिके यांनी 'गुढीपाडवा पट वाढवा अभियान' या उपक्रमाचे महत्त्व पालकांना पटवून दिले आणि जास्तीत जास्त मुलांनी जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घ्यावा, असे आवाहन केले.

सुंदर सजावट आणि नियोजन हा सोहळा यशस्वी करण्यासाठी विषयशिक्षिका वृषाली गुरव, उपशिक्षक शीतल पाटील, रुपाली लेंडवे आणि श्वेता जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षकांनी शाळेतील इतर मुलांच्या मदतीने संपूर्ण शाळा परिसर फुलांनी आणि सुंदर रांगोळ्यांनी सजवला होता, ज्यामुळे शाळेला उत्सवाचे स्वरूप आले होते.पालकांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक केले गावपातळीवर पट नोंदणी वाढवण्यासाठी हा सकारात्मक पुढाकार असल्याचे मत व्यक्त केले आहे.

> **मा. शिक्षणमंत्री महोदय यांच्या संकल्पनेतून नुकताच गुढीपाडवा–पट वाढवा हे अभियान सुरु झाले. नवघर मधील नवीन दाखल मुलांचे प्रवेश वाढावे ह्यासाठी हा उपक्रम निश्चितच महत्वपूर्ण ठरेल.**
> **–श्री. राजेंद्र अंबिके,**
> आयडॉल शिक्षक, शाळा–नवघर

# महाआराध्य प्रतिष्ठानचा समाजरत्न पुरस्काराने सन्मान



**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलीस न्युज २४ यांच्यातर्फे तृतीय वर्धापन दिनाचे औचित्य साधून सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या महाआराध्य प्रतिष्ठानचा समाजरत्न पुरस्काराने पुणे येथे रविवार, २२ मार्च २०२६ रोजी झालेल्या भव्य दिव्य अशा कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पोलीस न्युज – २४ संपादक रमेश गणगे, मुख्य संपादक स्मिता बाबरे, भाजप महिला मोर्च्याच्या राज्य सचिव यशोधरा गोडबोले, कॅप्टन निर्मलसिंग रंधावा,पूजा रंधावा यांच्याहस्ते व उपस्थितीत महाआराध्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद धारिया व संस्थापक संचालिका अंकिता प्रसाद धारिया यांना आकर्षक सन्मानचिन्ह,सन्मानपत्र,शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

# 'देवदूत' ठरलेला तरुण अपघातात हरपला

**खोपोली : प्रतिनिधी**



एमएसआरडीसीच्या देवदूत यंत्रणेत फायरमन म्हणून कार्यरत असलेला अवघ्या २८ वर्षांचा युवक प्रशांत आहेरचा रात्री नाशिक येथे जात असताना झालेल्या मोटारसायकल अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून आपला जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवणारा एक धाडसी तरुण अकाली हरपल्याची तीव्र खंत व्यक्त केली जात आहे.

प्रशांत आहेर एमएसआरडीसीच्या देवदूत यंत्रणेत कार्यरत राहून मुंबई पुणे एक्सप्रेस वे व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वर अपघातग्रस्तांना मदत करण्याचे काम अत्यंत तत्परतेने करत होता. अनेक गंभीर प्रसंगात त्याने स्वतःचा जीव धोक्यात घालून शेकडो जणांचे प्राण वाचवले होते. अपघातस्थळी प्रथम धाव घेणाऱ्या या सेवकाच्या रूपाने तो अनेकांसाठी 'देवदूत' ठरून जीवनदान देत होता.

नियतीच्या क्रूर खेळात नाशिककडे जात असतानाच त्याचाच जीव एका अपघातात गमवावा लागला. ही घटना केवळ दुर्दैवीच नव्हे, तर मनाला चटका लावणारी आहे.

# श्री स्वामी समर्थ प्रकटदिन साजरा



**कर्जत : प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ मठ पळसदरी येथे श्री स्वामी समर्थ प्रकटदिन अर्थात आनंदोत्सव हर्षोल्हासात साजरा झाला. यावेळी हजारो भाविकांनी श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

श्री स्वामी समर्थ प्रकटदिनी पहाटे ब्रम्ह मुहूर्तावर श्री स्वामी समर्थांचा सामुदायिक जप त्यानंतर काकडआरती, सकाळी महाअभिषेक, दत्तयाग, दुपारी महाआरती, महाप्रसाद तसेच दुपारी विवेक भागवत निर्मित द स्वर बरसात इव्हेंट प्रस्तुत भक्तीगीतांचा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमात सुर नवा ध्यास नवा कार्यक्रमातील गायिका आरोही प्रभुदेसाई आणि गायक अक्षय जोशी यांनी विविध भक्तीगीते सादर केली. या कार्यक्रमाचे निवेदन अनुया गरवारे–धारप यांनी केले. विवेक भागवत आणि रुचिरा निगुडकर यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.

यावेळी विक्रांत दरेकर, राजू पोतदार, वकील राजेंद्र निगुडकर, अभिजीत दरेकर, वकील प्रदीप सुर्वे, अशोक शितोळे, विठ्ठल सुर्वे, रघुनाथ निगुडकर, माधवी दरेकर,जुई दरेकर, मोनाली दरेकर, वत्सला वांजळे, प्राजक्ता साखरे, भानूदास शिंदे, सदानंद लोखंडे, दादू दरेकर, रितेश मांडे, अतुल सावंत, सचिन दरेकर, नरेंद्र दरेकर, महेंद्र निगुडकर, विशाल निगुडकर, दिलीप पांडे, पांडू बडेकर, विनया खोपकर, प्रकाश दरेकर, संजय मालगुंडकर, अरिन पोतदार, भालचंद्र वांजळे, विपुल निगुडकर, हनुमंत भांगे आदी उपस्थित होते.

